
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३५७
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार १४ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढणार’/२
जिल्हा परिषद शिक्षकाने बनविले शैक्षणिक ॲप/५
जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धा/८

## देशातील ७४,००० रेल्वे डब्यांमध्ये आता सीसीटीव्ही



**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले आहे की लवकरच देशातील सर्व ७४,००० डब्यांमध्ये आणि १५,००० इंजिनांमध्ये अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. सध्या ही यंत्रणा प्रायोगिक स्वरूपात उत्तर रेल्वेमध्ये वापरली जात होती आणि त्याचे परिणाम सकारात्मक आढळले. रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, प्रत्येक डब्यामध्ये चार ’डोम टाईप’ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. दोन समोरील व दोन मागील दरवाजांजवळ हे सीसीटीव्ही असतील. तर इंजिनमध्ये सहा कॅमेरे असतील. यात पुढे, मागे, दोन्ही बाजूंना आणि दोन्ही कॅबिनमध्ये प्रत्येकी एक कॅमेरा तसेच दोन डेस्क-लावलेले मायक्रोफोनदेखील बसवले जातील. या निर्णयामुळे विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक प्रभावीपणे हाताळला जाईल, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# संघर्ष हाच यशाचा मार्ग -लोकनेते रामशेठ ठाकूर

## ‘सीकेटी’त गुणवंत विद्यार्थी सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संघर्ष हाच यशाचा मार्ग आहे. त्यामुळे पदवी घेऊन शांत राहू नका तर पुढच्या पदव्यापण प्राप्त करा, अशा सल्ला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना दिला. खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितिय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि.१३) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व.चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद महादेव कारंडे व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर आदी उपस्थित होते.



### मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवांची प्रमुख उपस्थिती

मुख्य अतिथी मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद महादेव कारंडे यांनी, भारतीय संस्कृतीने शिकवलेल्या उदात्त विचारसरणीचा आपल्या अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातून समावेश झाला ही अत्यंत महत्वपूर्ण गोष्ट आहे, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअरची दारे खुली झाली आहेत व त्याचा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ करून घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविले. यानंतर पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना संबोधित करताना भविष्यातील संधींचे सोने करण्यासाठी येणाऱ्या आव्हानांवर स्वार होऊन पुढे जाण्याचा संदेश देत, जागतिक पातळीवरच्या आव्हानांसाठी सज्ज राहण्यास सांगितले. तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाषणात प्रत्येक विद्यार्थ्यांने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे, असे सांगून विद्यार्थ्यांना पुढच्या भविष्यातील वाटचालींसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सिताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, स्वप्नील ठाकूर, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव तसेच महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पनवेलचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, ॲड. राहुल घरत, अतुलशेठ भगत व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

स्व.चांगु काना ठाकूर यांचे पुण्यस्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या या सोहळ्याची सुरुवात ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली. (पान २ वर..)

# पैशांचा पाऊस पाडण्यासाठी कर्जतच्या स्मशानभूमीत अघोरी विद्या

## दोन जण ताब्यात, चौघे पळाले



**नेरळ : प्रतिनिधी**

आजही अंधश्रद्धेचे भूत मानवाच्या बोकांडी बसून आहे. असाच प्रकार सध्या कर्जतमधून उघडकीस आला. हालिवली आदिवासी वाडीतील स्मशानभूमीत पैशाचा पाऊस पाडण्यासाठी तरुणांकडून अघोरी विद्या केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. यासाठी रात्रीच्या वेळी स्मशानभूमीत तरुणांकडून हालचाली सुरू होत्या, मात्र हा प्रकार ग्रामस्थांना समजताच येथील ग्रामस्थानी घटनास्थळी धाव घेत काळी जादू उधळून लावत दोन तरुणांना पकडले मात्र चार साथीदार पळून जाण्यात यशस्वी ठरले. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.


११ जुलैची रात्र होती घड्याळात १० वाजले होते. एकीकडे मुसळधार पाऊस आणि दुसरीकडे कर्जत तालुक्यातील हालवली ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी वाडीतील स्मशानभूमीत काळी जादू केली जात होती. पैशाचा पाऊस पाडण्यासाठी ही अघोरी विद्या सुरू असल्याचे माहितीत समोर आले आहे. यासाठी सहा अज्ञात तरुणांनी वेगवेगळे साहित्य गोळा केले होते. गुलाल, अभिर, काळया आणि सफेद कपड्यात गुंडाळल्या दोन बाहुल्या, लिंबू, सुगंधी द्रव, गोणपाट यासह पिशवीत बरेच साहित्य एका ठिकाणी मांडण्यात आले होते. (पान २ वर..)

### याआधीही केली होती काळी जादू

कर्जत तालुक्यातील लोभेवाडी येथे दोन रस्त्याच्या मध्येच गावावर करणी करण्यासाठी काहींनी काळी जादूचा प्रकार घडवून आणला होता. दरम्यान आता चक्क पैशाचा पाऊस पाडण्यासाठी स्मशानभूमीत अघोरी विद्या केली जात असल्याने परिसरात खळबळ माजली.

## फणसाड डॅममध्ये पर्यटकाचा बुडून मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**



मुरूड तालुक्यातील प्रसिध्द फणसाड डॅममध्ये वर्षा सहल पर्यटनासाठी आलेल्या मुंबई-अंधेरी येथील पर्यटकाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मुंबई अंधेरी येथून वर्षा सहल पर्यटनासाठी आलेल्या ११ जणांचा ग्रुप बोर्ली येथून रविवारी (दि.१३) फणसाड डॅम येथे पोहचला दुपारी १२ वाजण्याचा सुमारास फणसाड डॅमच्या पाण्यात पोहण्यास उतरलेला मुंबई-अंधेरी येथील साहिल राजू रणदिवे (वय २४) बुडून बेपत्ता झाला.

याबाबतची मिंसींग तक्रार दीपक नारायण पांचाळ (रा. मुंबई-अंधेरी) यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिली. यानंतर सायंकाळच्या सुमारास पाण्यात बुडून मृत्यू झालेला साहिल राजू रणदिवे यांच्या मृतदेह सापडला. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक दीपक म्हशीलकर करित आहेत.

## शनिशिंगणापूर फसवणूक प्रकरणात चौकशीचे आदेश

**नगर :** शनिशिंगणापुरात भाविकांची देवाच्या नावे कोट्यवधी रूपयांची फसवणूक झाली आहे. ऑनलाईन पद्धतीनं पूजा, बनावट ॲप, क्युआर कोड, बोगस कर्मचारी असा मिळून तब्बल ५०० कोटींचा घोटाळा केल्याचे आरोप भाजप नेते ऋषिकेश शेटेंनी केले आहेत. यावर विश्वस्थ मंडळ बरखास्त केले जाईल, देवाच्या नावाने भ्रष्टाचार करणाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

## बिहारमध्ये भाजप नेत्याची हत्या

**पाटणा : वृत्तसंस्था**

बिहारची राजधानी पाटणा येथे एका भाजपच्या नेत्यावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. हत्या झालेल्या भाजपच्या नेत्याचे नाव सुरेंद्र केवट यांनी गोळ्या घालून हत्या करण्यात आली. दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी सुरेंद्र केवट यांच्यावर गोळीबार केला. सुरेंद्र केवट यांना चार गोळ्या लागल्या होत्या. त्यांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला. सुरेंद्र केवट हे भाजप किसान मोर्चाचे पुनपुन विभागाचे अध्यक्ष होते.

दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांच्यावर गोळीबार केला. यात ते जखमी झाले. त्यांना चार गोळ्या लागल्या होत्या. सुरेंद्र केवट यांना तातडीने पाटणातील एम्स रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पिपरा पोलीस ठाण्याचे प्रमुख आणि मसौदीचे उपायुक्त कन्हैया प्रसाद सिंह यांनी गोळीबार झालेल्या ठिकाणाला भेट दिली आणि पाहणी केली. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरु केला आहे. आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

## निवडक

### भाजपचे माजी आमदार कोटा श्रीनिवास राव यांचे निधन



**हैदराबाद :** भाजपाचे माजी आमदार आणि ज्येष्ठ दाक्षिणात्य अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचे निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांनी तीन दिवसांपूर्वीच वाढदिवस साजरा केला होता. रविवार १३ जुलै २०२५ रोजी हैदराबादमधील फिल्मनगर येथील घरी कोटा श्रीनिवास राव यांनी अखेरचा श्वास घेतला.

### राज्यातील हवामानात होतोय झपाट्याने बदल

**मुंबई :** राज्यात हवामानात यंदा मोठ्या प्रमाणात चढ-उतार पाहायला मिळत असून पूर्वमोसमीपासून ते सध्याच्या मोसमी पावसापर्यंत वातावरणात अस्थिरता जाणवत आहे. यामुळे पावसाचा अचूक अंदाज बांधणे हवामान खात्यासाठीही कठीण ठरत आहे. दरम्यान, १४ जुलै रोजी तळकोकणासह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि घाटमाथा असलेले पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्हे यलो अलर्टच्या प्रभावाखाली राहतील.

# भाजपमध्ये इनकमिंग सुरूच!

## पाले बुद्रुक, फणसवाडीतील शेकाप, ठाकरे गटातील कार्यकर्त्यांचा प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील पाले बुद्रुक आणि फणसवाडीतील शेकाप आणि शिवसेना उबाठा गटातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शनिवारी भाजपच्या कार्यप्रणालीवर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. यासर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पक्षात स्वागत केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपची ताकद आणखी वाढली आहे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजप नेते प्रल्हाद केणी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, अंकूश पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, बुधाजी मोरावकर, लक्ष्मण उलवेकर, अविनाश उलवेकर, गोविंद म्हात्रे, प्रमोद भोपी, जनार्दन उलवेकर, नवनाथ खुटारकर, बाळकृष्ण पाटील, नाथाशेठ आगलावे, भास्कर आगलावे, सुरेश आगलावे, भगवान दरे, सोपान आगलावे, दगडुशेठ आगलावे, डॉक्टर संतोष आगलावे, जनार्दन आगलावे, अंकुश पाटील, जितेश म्हात्रे, पवन भोईर, प्रगती उलवेकर, कुसुक उलवेकर, सविता उलवेकर, रानी मोरावकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)

## वकील उज्ज्वल निकम यांची राज्यसभा खासदारपदी नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रख्यात कायदेपंडित उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती कोट्यातून ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. उज्ज्वल निकम यांच्याबरोबरच भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, शिक्षणतज्ज्ञ सी सदानंदन मास्ते, शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांचीही राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्य म्हणून म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे.



भारतीय जनता पक्षाने उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून प्रख्यात कायदेपंडित उज्ज्वल निकम यांना लोकसभेची उमेदवारी दिली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. काँग्रेसच्या नेत्या वर्षा गायकवाड यांनी उज्ज्वल निकम यांचा पराभव केला होता. लोकसभेला पराभव झाल्यानंतर आता उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील कसाबला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहचवण्यापर्यंत वकील उज्ज्वल निकम यांची मोलाची भूमिका राहिली होती. उज्ज्वल निकम यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले होते. त्यामुळे आता उज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती नामनिर्देशित खासदार म्हणून राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपतींनी त्यांच्या विशेष अधिकारांचा वापर करून उज्ज्वल निकम यांच्यासह माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, शिक्षणतज्ज्ञ सी सदानंदन मास्ते, शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांची राज्यसभेवर नियुक्ती केली आहे. या संदर्भातील माहिती केंद्र सरकारकडून देण्यात आल्याचं वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

# पावसाअभावी भात लावणीची कामे खोळंबली

### आतापर्यंत केवळ २० टक्के लागवड



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १५ दिवसांपूर्वी भातलावणीच्या कामाला सुरूवात झाली, मात्र अलीकडच्या काही दिवसात पावसाने उघडीप दिल्याने लावणीच्या कामांचा खोळंबा झाला आहे. पावसाअभावी शेतात पुरेसे पाणी नसल्याने लावणी करता येत नाही. जुलै महिना अर्धा संपत आला तरी आतापर्यंत जिल्ह्यात २० टक्के भातलागवड पूर्ण झाली आहे.

यावर्षी रायगड जिल्हयात पावसाने वेळेपूर्वीच हजेरी लावली. मे महिन्याच्या अखेरीस झालेला अवकाळी पाऊस आणि त्यापाठोपाठ मान्सूनची हजेरी यामुळे शेतीच्या कामाचा बट्ट्याबोळ झाला. शेतकऱ्यांना धुळवाफ्यांची पेरणी करताच आली नाही. अनेकांनी चिखलपेरा केला तर काहींनी रहू पदधतीने पेरणी केली. अनेकांनी तर शेतीकडे पाठ फिरवली.

सुरूवातीला जोरदार बरसणाऱ्या पावसाचा वेग पुढच्या काळात मंदावला. जून महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. जुलै महिना मोठया पावसाचा समजला जातो. परंतु जुलै मध्ये आतापर्यंत अपेक्षित पाऊसच झाला नाही. त्यामुळे शेतात पुरेसे पाणी साठून राहिले नाही. रोपांची अपेक्षित वाढ झाली असली तरी पुरेशा पाण्याअभावी लावणीची कामे खोळंबली.

**भात रोपे तयार झाली आहेत. त्यामुळे लावणी सुरू केलेली आहे. आतापर्यंत १८ हजार हेक्टरवर लावणी झाली आहे. पावसाने उघडीप घेतल्याने अडचण येत आहे, मात्र पाऊस आल्यानंतर उर्वरित ठिकाणी भात लावणी सुरू होईल.**
**-वंदना शिंदे,**
**कृषी अधिकारी, रायगड**

### शेतीक्षेत्रात घट

रायगडात शेतीचे क्षेत्र दरवर्षी घटत चालले आहे. एक लाख २५ हजार हेक्टरचे खरीप भात लागवडीचे क्षेत्र मागील ४० हजार हेक्टरने कमी झाले. यंदा साधारण ८३ हजार हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे लक्ष्य कृषी विभागाने ठेवले आहे.

### मजुरांची वानवा

यंदादेखील मजुरांची समस्या भेडसावते आहे. त्यातच मजुरी वाढली आहे. पुरूषांसाठी ६० रूपये तर महिलांना दिवसाची ४०० रूपये इतकी मजुरी द्यावी लागते आहे. शिवाय संध्याकाळची सोय करावी लागते. यामुळे शेती परवडत नाही असे शेतकरयांचे म्हणणे आहे. लावणीच्या कामासाठी अनेकजण सुटी टाकून गावी आले आहेत, परंतु पाऊस नसल्याने लावणी थांबली असून सुट्टी वाया गेली आहे.

# भाजयुमोतर्फे खारघरमध्ये रक्तदान शिबिर

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ७५व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सव वर्षानिमित्त युवा मोर्चाच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर राबविण्यात येते. त्या अनुषंगाने खारघर मंडल भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रविवारी (दि.१३) खारघरमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात ९७ नागरिकांनी उपस्थिती नोंदवली, तर त्यापैकी ७० जणांनी यशस्वीपणे रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली तसेच ज्यांनी ज्यांनी रक्तदान केले त्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. (पान २ वर..)



### मान्यवरांकडून आयोजकांचे कौतुक

या शिबिरास पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष भेट देत, खारघर युवा मोर्च्याच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक करत, समाजसेवेत त्यांचा सहभाग प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही उपस्थित राहून, मानवतेसाठी व समाजाच्या ऋणातून प्रेरित झालेले रक्तदान हे अत्यंत पवित्र व निःस्वार्थ सेवा कार्य आहे, असे उद्गार काढले.

# न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करणार -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



येथील धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी आणि संजय मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुन्ह्यांची सिद्धता होऊन गुन्हेगारास शासन व पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्त्वाची ठरते. नवीन भारतीय फौजदारी कायद्यांनी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे तसेच विवक्षित गुन्ह्यांमध्येही यास अनिवार्यता प्राप्त झाली आहे. राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले असून वैविध्यपूर्ण पद्धतीचा अवलंब, तांत्रिक पुरावे आणि न्यायसहायक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला व १४ शासन निर्णय काढून गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरुन ५४ टक्क्यांवर आणले. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करतांना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांपुढे घेऊन जावे लागेल, राज्यात आधुनिक सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारुन त्याचे महामंडळात रुपांतर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.तत्पूर्वी, गृह विभागांतर्गत नव्याने कार्यन्वित झालेल्या प्रयोगशाळा संगणकीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याचे, मुंबई येथील सेमी टोमेटेड सिस्टीमचे आणि पुणे येथील सेंटर ऑफ एक्सलन्सचे ऑनलाईन लोकार्पण त्यांचे हस्ते झाले.

# महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढणार

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. महायुती एकत्रित लढणार असल्याचे सांगत महायुती एकत्र निवडणूक लढणार की स्वबळावर याबाबतचा संभ्रम संभ्रम भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दूर केला आहे.



त्यातच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ एकत्रित या निवडणुका लढण्याचे संकेत मिळत असल्याने राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे, तर दुसरीकडे महायुतीनेही निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वृत्तवाहिन्यांशी बोलताना निवडणुकांबाबत भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांनी महायुती म्हणूनच महापालिका निवडणुका लढवणार असल्याचे जाहीर केले. महापालिका निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. त्या महायुती म्हणूनच लढवल्या जातील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अधिवेशन संपल्यावर प्रत्येक विभागात आम्ही जाणार आहोत. कार्यकर्ते आणि जिल्ह्याच्या टीमशी संवाद साधणार आहोत. भेटीगाठी होणार आहेत. कार्यकर्ता आणि नेता एकत्र चर्चा करतील. येणाऱ्या काळात महायुतीचे चांगले वातावरण करू आणि सर्व महापालिकांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढू. मुंबई ठाणे पालिकेच्याही लढू. आम्हाला वातावरण पोषक आहे. त्यामुळे एकत्र लढण्याचे ठरवले आहे, असे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

हिंदीबाबतचा संभ्रम कोणात नाही. फक्त राज आणि उद्धव ठाकरेंमध्ये संभ्रम आहे. त्यांचा संभ्रम दूर करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे, पण त्यांनी हा मुद्दा निवडणुकीचा केला असेल तर त्याला काही करू शकत नाही.

वाहिन्यांनीही त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. एखादा मुद्दा किती वेळ चालवावा यासाठी समिती स्थापन केली आहे. समिती या संदर्भातील अभ्यास करून अहवाल तयार करणार आहे. विधानसभेत तो पाठवेल.

### महापौरपदाचा निर्णय मुख्यमंत्रीच घेणार

***मुंबई महापालिकेच्या फॉर्म्युल्यावर वरिष्ठ पातळीवर त्यांची, आमची कोअर टीम बसून चर्चा करतील. जागा वाटपाचे सूत्र ठरवतील. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकत्र बसून जागा वाटप ठरवतील. या नेत्यांचा राजकारणातील प्रदीर्घ अनुभव आहे. तेच जागा वाटपाचे सूत्र ठरवतील, असे सांगतानाच महापौर पदाबाबतचा निर्णय त्यावेळी होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरवले तर महापौरपद एकनाथ शिंदे गटाला देऊ, असे रवींद्र चव्हाण या वेळी म्हणाले.***

# ॲड. राजीव साबळे २ ऑगस्ट रोजी करणार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

माजी रायगड जिल्हा परिषद सभापती ॲड. राजीव साबळे २ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती ॲड. राजीव साबळे यांनी दि. १३ जुलै रोजी पत्रकार परिषदेत दिली. माणगाव शहरातील अशोकदादा साबळे लॉ कॉलेज येथे पत्रकार परिषदेला नगरपंचायतीचे पाणी पुरवठा सभापती कपिल गायकवाड, स्वीकृत नगरसेवक सुनील पवार, विरेश येरूणकर उपस्थित होते.



शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी पत्रकार परिषद घेत ॲड. राजीव साबळे व माणगाव नगरपंचायत नगरसेवक यांना पैशाचे आमिष दाखवून खासदार सुनील तटकरे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घेत असल्याचे विधान केले होते.त्याला उत्तर देतांना हे आरोप बिनबुडाचे असून आता कोणतीही निवडणूक नाही. तसेच शिवसेना प्रवक्ते हे पद नावापुरतेच माझ्याकडे आहे.मी कोणत्या पक्षाच काम करणे हे माझं वैयक्तिक विषय आहे. मी सर्वांना आवाहन केलं आहे. ज्यांना माझ्यासोबत यांयचं आहे. ते दि. २ ऑगस्टला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आम्ही नाराज नाही. परंतु, त्यांची भेट होऊन दिली जात नाही. अनेक कामे प्रलंबित आहेत. जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी किती शिक्षण संस्था चालवल्या आहेत. त्यांनी व अरुण चाळके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करताना किती पैसे घेतले होते. ते आता आमच्यावर पैसे घेऊन पक्ष प्रवेश करत आहे, असे आरोप करत आहेत.

त्यांना याबाबत कायदेशीर नोटीस बजावणार आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून सर्व कामे पूर्ण केली जातील, असा विश्वास त्यांनी दिला आहे.

# मोफत आरोग्य शिबिराचा रुग्णांनी घेतला लाभ

**चौक :** ओम साई मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल आणि ग्राम पंचायत वावंढळ सरपंच सुहास कदम यांच्या संयुक्त विद्यमाने वावंढळ येथे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते, त्याचा अनेक गरजूंनी लाभ घेतला. छाती दुखणे, मुतखडा, चक्कर येणे,दम लागणे, स्त्रियांच्या सर्व समस्या, जुने हृदयरोग, थकवा येणे, गुडघेदुखी, डोकेदुखी, सांधे व हाडांच्या समस्या, छाती धडधडणे, रुटीन चेकअप, हृदयरोग यावर मोफत तपासणी करून औषधे देण्यात आली. तर डायबेटीस (मधुमेह), रक्तदाब, रक्त तपासणी देखील करण्यात आली. यावेळी काही रुग्णांची ईसीजी करण्यात आली.



# ‘कबड्डीतील किमयागार’ पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबई : प्रतिनिधी**

विनायक दळवी लिखित कबड्डीतील किमयागार या संदर्भ ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन शरद पवार यांचे हस्ते झाले त्याप्रसंगी अनेक राष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते.

त्यामध्ये अर्जुन पुरस्कार विजेते सदा शेट्ये , शांताराम जाधव, राजू भावसार, अशोक शिंदे, माया आकरे यांचा समावेश होता. तर राष्ट्रीय खेळाडूंमध्ये आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेता खेळाडूंमध्ये चित्रां नाबर, शैला रायकर,ग्रेटा डिसोजा, सुनील जाधव जेम्स परेरा, विजया शेलार, सागर बांदेकर ,आजी माजी राष्ट्रीय कबड्डीपटू ,माजी खासदार कुमार केतकर हे मान्यवर देखील उपस्थित होते.

# स्वच्छता पोस्टर स्पर्धेत पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी साकारल्या चित्रमयी स्वच्छता संकल्पना

**नवी मुंबई : बातमीदार**

‘सफाई अपनाओ – बिमारी भगाओ’ अभियानामध्ये नमुंमपा घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त सहयोगातून महानगरपालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये ‘स्वच्छता पोस्टर स्पर्धा’ आयोजित करण्यात आली होती. यामध्ये २३ शाळांमधील ४५६२ विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपल्या मनातील स्वच्छतेच्या संकल्पना पोस्टर्सवर चितारल्या.



‘सफाई अपनाओ – बिमारी भगाओ’ अभियानामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असताना यामध्ये विद्यार्थी सहभागावरही विशेष लक्ष दिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या मनावर लहान वयातच स्वच्छतेचा संस्कार व्हावा व त्यामधून उद्याचे स्वच्छताप्रेमी नवी मुंबईकर नागरिक घडावेत यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सहभागावरही भर दिला जात आहे.

# पालिका शाळेतील ४७ विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत झळकले

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र परीक्षा परिषदेमार्फत दरवर्षी पूर्व उच्च प्राथमिक परीक्षा (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) या दोन इयत्तांसाठी परीक्षा घेतली जाते. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील इयत्ता ५ वीचे ८५१ विद्यार्थी व इयत्ता ८ वीचे ७९३ विद्यार्थी असे एकूण १६४४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते.

या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यम व सर्व व्यवस्थापन शाळांमधील इयत्ता ५ वी च्या १२९ व इयत्ता ८ वी च्या ११० अशा एकूण २३९ विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले आहे.

यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील इयत्ता ५ वी च्या २५ विद्यार्थ्यांना व इयत्ता ८ वीच्या २२ विद्यार्थ्यांना अशाप्रकारे एकूण ४७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त झाले आहे. यामध्ये नमुंमपा शाळा क्र.४२, घणसोली येथील स्वराली विठ्ठल जगधने (इयत्ता ८ वी) या विद्यार्थिनीने महानगरपालिकेच्या शाळांमधून प्रथम क्रमांक मिळवला असून ठाणे जिल्हयातून तिसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच शुभ्रा भगवान गायकवाड (इयत्ता ५ वी) या विद्यार्थिनीने नमुंमपा शाळांमधून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

**पान १ वरुन**

## संघर्ष हाच यशाचा मार्ग -लोकनेते रामशेठ ठाकूर

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. त्याचबरोबर आपल्या भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे प्रभारी डॉ. एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली.

सूत्रसंचालन डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. ए. व्ही. पाटील, प्रा. एन. एच. कडु तर आभारप्रदर्शन डॉ. एस. एन. परकाळे यांनी केले, तसेच या कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पैशांचा पाऊस पाडण्यासाठी कर्जतच्या स्मशानभूमीत अघोरी विद्या

दरम्यान, ही माहिती येथील स्थानिकांच्या कानावर होती. अनोळखी व्यक्ती संशयास्पद हालचाली करत असल्याचे समोर आल्याने लागलीच ग्रामस्थानी स्मशानभूमीत धाव घेतली. या वेळी ग्रामस्थांना आपल्याकडे येताना पाहून यातील चार तरुण पळून जाण्यास यशस्वी ठरले तर दोन तरुणांना पकडण्यात ग्रामस्थांना यश आले. सुरुवातीला ग्रामस्थानी स्मशानभूमीतील प्रकार पाहून दोन तरुणांना चांगला चोप दिला व कर्जत पोलिसांना माहिती देण्यात आली. पकडलेल्या तरुणांमध्ये एक तरुण स्थानिक असल्याचे समोर आले असून दुसरा तरुण हा सुधागड पाली येथील राहणारा असल्याचे चौकशीत समोर आले आहे.

## भाजपमध्ये इनकमिंग सुरूच







सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात दिपक उलवेकर यांच्या नेतृत्वाखाली उबाठा गटाचे माजी सरपंच संजय जोमा भगत, माजी उपसरपंच संजय शंकर पारधी, सदस्य जोमा पारधी, जगु पारधी, मंगळ्या पारधी, शेकापचे माजी सदस्य पिंट्या भगत, काळुराम पारधी, बुधाजी पारधी, यांच्यासह जोमा भगत, अनंता पारधी, प्रकाश पारधी, निलेश पारधी, बाळकृष्णा पारधी, बाळु भगत, जोमा पारधी, मंगळ्या पारधी, संदिप पारधी, रमेश भगत, कमलाकर पारधी, धर्मा पारधी, पप्या पारधी, राजेश पारधी, मंगेश पारधी, राजू पारधी, सचिन पारधी, बाळु आंबो पारधी, सुनिता पारधी, छाया पारधी, गीता पारधी, सावीत्री पारधी, जेवंती पारधी, बाळू मंगळ्या पारधी, सुषामा पारधी, इंदु पारधी, पप्पी भगत, अनि भगत, सुनिता जोमाभगत, संगीता भगत,चांगी भगत, शैला पारधी, बळी पारधी, सुमन पारधी, सुनिता रमेश भगत, प्रेमा पारधी, प्रियमका पारधी, लिला पारधी, भिमा पारधी, बामी पारधी, पपी पारधी यांनी भाजपमध्ये जाहिर पक्ष प्रवेश केला.

दरम्यान, या वेळी भाजपच्या राज्य परिषद सदस्य पदी अरुणशेठ भगत यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे उपस्थिती मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## भाजयुमोतर्फे खारघरमध्ये रक्तदान शिबिर

या वेळी भाजपचे जिल्हा सरटिणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, भाजपचे पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, खारघर मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, सरचिटणीस अक्षय लोखंडे, वासुदेव पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, खारघर मंडळ अध्यक्ष नितेश पाटील, माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, प्रवीण रामजी बेरा, युवा अध्यक्ष आशिष कडू, अक्षय सिंग, समीर कदम, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, विजय पाटील, संतोष शर्मा, अक्षय सिंग, डॉ. विजय उजलंबे, आदित्य हातगे, योगेश पाटील, मयूर घरत, कोमल शिंदे, दुर्गा बन्सल, अभिजित देहाडे, सुमित देहाडे, प्रथम पाटील, सार्थक दोरुगडे, दिनेश यादव, अंकुर शर्मा, राहुल शिंदे, ध्रुव गजरा, अमित बोढई, स्नेहल बोढई, वैभव शेजवळ, संदीप माघाडे, निर्मला यादव, शोभा मिश्रा, अंकिता वारंग, कुणाल देवकर, मधुमिता जेना व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा मोर्चा, महिला मोर्चा व विविध विभागांतील स्वयंसेवकांनी अथक मेहनत घेतली. हा उपक्रम समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित करणारा ठरला.

**दानशूर व्यक्तिमत्त्व असलेल्या रामशेठ ठाकूर साहेबांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त, आज मला माझे ७५वे रक्तदान करण्याचं भाग्य लाभलं, ही बाब माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आणि समाधानकारक आहे.**

**-दीपक शिंदे, भाजप शहर सरचिटणीस, खारघर**



# खारघर, कळंबोलीतील वाहतूक कोंडी सुटेना

**पनवेल : वार्ताहर**

वाढत्या वाहनांमुळे खारघर वसाहत वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडली आहे. वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करून दंड वसूल करण्यावर भर देत असल्यामुळे रहिवाशांमध्ये नाराजी पसरली आहे.



खारघर परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नवी मुंबई वाहतूक विभागाने १५ वर्षांपूर्वी खारघरमधील हिरानंदानी पुलाखाली वाहतूक कार्यालय सुरू करण्यात आले. प्रामुख्याने नवरंग सर्कल कडून गोखले शाळे मार्गे शिल्प चौक कडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक विभागाने सम-विषम पार्किंग सुरू केली. नियमांचे उलंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक होते, मात्र वाहतूक पोलिसांनी त्याकडे डोळेझाक केल्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या त्रासामुळे या रस्त्यावरून धावणाऱ्या बेस्ट आणि एनएमएमटी प्रशासनाला बसेस बंद कराव्या लागल्या. विशेषतः सायंकाळी पाच नंतर खरेदीसाठी घराबाहेर पडणारा दुचाकी, चार चाकी वाहन चालक रस्त्यावर मिळेल, त्या ठिकाणी उभी करीत असल्यामुळे बँक ऑफ इंडिया कडून शिव मंदिरकडे जाणाऱ्या मेट्रो मार्ग, नवरंग सर्कल कडून गोखले शाळा मार्गे शिल्प चौककडे जाणाऱ्या रस्त्यावर आणि सेक्टर-१३ शिल्प चौक शेजारी असेलल्या डेली बाजार चौक समोरील आणि शिल्प चौक समोरील रस्त्याचा दोन्ही बाजुला विविध दुकाने आणि शॉपिंग कॉम्प्लेक्स आहेत. त्यामुळे खरेदीधारक जागा मिळेल त्या ठिकाणी वाहने उभी करीत असल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. मात्र, वाहतूक पोलिसांकडून हिरानंदानी, उत्सव चौक, सेंट्रल पार्क, डेली बाजार चौक आदी भागात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जात असल्यामुळे खारघर शहर वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडला आहे.

सिडकोने खारघर, सेक्टर-१२, १३, २० आणि २१कडे जाणाऱ्या रस्त्याच्या मध्यभागी शिल्प चौक उभारले आहे. सेक्टर-१२कडे जाणाऱ्या रस्त्याचा कडेला द पॅसिपिक कमर्शियल इमारत आहे. इमारतीच्या तळमजल्यावर खाद्य पदार्थ, दुकान, मोबाईल शॉप, रुग्णालय तसेच काही कार्यालये आहेत. दुसरीकडे बँका आणि विविध बँकेचे एटीएम, टुर्सच्या गाड्या, बस आणि रिक्षा थांबा आहे. त्यात दुकानातील व्यापारी, दुकानदार तसेच खरेदीसाठी येणारे ग्राहक रस्त्यावरच वाहने उभी करतात. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ वाहतूक कोंडी होत असते विशेषतः सदर रस्ता अरुंद आहेत. त्यामुळे शिल्प चौक वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडला आहे.

> **खारघर वसाहतीत होणाऱ्या वाहतूक कोंडीविरोधात नियमितपणे कारवाई केली जात आहे. ज्या रस्त्यावर वाहतूक कोंडी आहे. त्या रस्त्यावर वाहतूक पोलीस पथकांमार्फत कारवाई केली जाईल.**
>
> **-तिरुपती काकडे, उपायुक्त, वाहतूक विभाग, नवी मुंबई**



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली शहरात नित्याची वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनचालक, नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी केली जात आहे.

कळंबोली शहरात सिमेंट काँक्रिटीकरणाची रस्त्याची कामे सुरू आहेत. या कामांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. सेकटर ३ ई परिसरात एनएमएमटी बस थांबा, मिरची हॉटेल ते पेट्रोल पंप पर्यंत वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागतो. अर्धा ते एक तास नागरिक वाहतूक कोंडीत अडकतात. त्यामुळे याचा मनस्ताप नागरिकांना सहन करावा लागतो. वाहतूक कोंडी न होण्यासाठी या ठिकाणी वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी नागरिक आणि वाहन चालकांकडून केली जात आहे.

## एमकेसीएल कोर्सेसचे विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.१२) सकाळी ११ वाजता एमकेसीएल समितीच्या वतीने महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड अंतर्गत प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या ओरिएंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या नव्या वाटा आणि करिअरच्या संधी समजावून सांगण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एमकेसीएल प्रतिनिधी विश्वास मते एमकेसीएल एक्झिक्यूटिव्ह यांनी विद्यार्थ्यांना कोर्सची माहिती दिली. त्यांनी एमकेसीएलद्वारे चालवल्या जाणाऱ्या KLiC (Knowledge Lit Careers) कोर्सेसची ओळख करून दिली आणि विविध कौशल्य आधारित शिक्षणक्रमांची माहिती दिली त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांना खढ, डिजिटायझेशन, डेटा एंट्री, डिजीटल मार्केटिंग, आणि सॉफ्ट स्किल्स यासारख्या कोर्से सबद्दल माहिती तसेच कोर्स पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र आणि नोकरीच्या संधी मिळतील, असे नमूद केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मनीषा शिलेदार (समन्वयक, एमकेसीएल समिती यांनी केली तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. स्नेहा नाईक व प्रा. योगिता पाटील तसेच इतर शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.





**पनवेल : भाजप कार्यकर्ते प्रशांत कडू यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रणय कडू, विशाल खोत, विकी घरत, प्रणाम कडू, श्रेयस ठाकूर आदी उपस्थित होते.**



**उरण : भाजपचे रवी भोईर यांची महाराष्ट्र राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल कळंबूसरे गावचे उद्योजक तथा भाजप कार्यकर्ते सुशील सुरेश राऊत यांनी रवी भोईर यांचे अभिनंदन केले. सोबत भाजप कार्यकर्ते विपिन पाटील.**





**पनवेल : मंथन मंगेश पिलविळकर याला वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : भाजप प्रदेश महासचिव तथा विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांना वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत समीर कदम.**

## आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधान परिषदेचे आमदार तथा भाजपचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव विक्रांत पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून शनिवारी (दि.१२) साजरा झाला.

या वाढदिवसाच्या औचित्यसाधून पनवेलमध्ये अभिष्टचिंतन सोहळा तसेच जेष्ठ नागरिकांना छत्री आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांच्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, डॉ. संजीव नाईक, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी विक्रांत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच छत्री आणि शालेय साहित्याचे वाटप केले.

दरम्यान, या वेळी या अभिष्टचिंतन सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून विक्रांत पाटील यांचा वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



## उरण डाऊरनगर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**उरण : वार्ताहर**

डॉ.सुहास हळदीपूरकर यांचे लक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्ट पनवेल, भाजप उरण तालुका सरचिटणीस कैलास मोरेश्वर भोईर ग्रुप ग्रामपंचायत चाणजे भाजप सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यातील डाऊर नगर रायगड जिल्हा परिषद शाळा डाऊर नगर येथे मोफत नेत्र तपासणी ठेवण्यात आले होते. शिबिराचे आयोजन भाजप उरण तालुका सरचिटणीस कैलास मोरेश्वर भोईर यांनी केले होते.

सर्व ग्रामस्थ मंडळ, परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. उरण विधानसभा आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर झाले. या वेळी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेवक कौशिक शाह, तालुका सरचिटणीस, कैलास मोरेश्वर भोईर, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, चाणजे ग्रामपंचायत सदस्य किंजल कैलास भोईर, लक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्ट पनवेलचे विनोद पाचघरे आदी उपस्थित होते.



## उलवे येथे महिलांच्या आरोग्यबाबत संवाद कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उलवे रहिवाशी संघटनेच्या वतीने उलवे येथे नागरिक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांच्या आरोग्य विषयावर नागरिक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी डॉ. कृष्णा बोरकर, डॉ. मोना बोरकर, डॉ. अपेक्षा काळे, डॉ. बरुण कुमार यांनी उपस्थित महिलांसोबत संवाद साधला. महिलांनी आपल्या आरोग्यविषयक प्रश्नांवर डॉक्टरांशी मोकळेपणाने चर्चा केली. कार्यक्रमानंतर सर्व महिलांनी समाधान व आभार व्यक्त केला.





योगगुरु मीना भावसार यांनी योगाच्या माध्यमातून आरोग्य सुदृढ ठेवण्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. बोरकर व त्यांच्या टीमने संघटनेचे अध्यक्ष अवधेशभाई महतो व त्यांच्या कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि भविष्यात आरोग्य विषयक उपक्रमांमध्ये संपूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला संकल्प घरत, अखिल यादव, सागर रंधवे, उदय पांडे, अवनीश सिंग, देवालय मित्रा, मंजुल शुक्ला, विलास चंदेल, कपिल यादव, संदीप मागर, अखिलेश विश्वकर्मा, भारत गुप्ता, आदिनाथ, आर. सी. पिल्लई, शेखर नाडर, कृष्णन, पुष्पा भट, मनोज यादव, अनुराधा शुक्ला, पल्लवी सुर्वेआदींसह उलवे रहिवाशी संघटना सर्व सहभागी आणि सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## शिवाजीनगर येथे सापाच्या पिल्लांना जीवदान

**पनवेल, उरण : बातमीदार**

उलवे, शिवाजीनगर येथील सिडको उद्यानामध्ये दगडाच्या आतमध्ये सापडलेली सापाची अंडी सुखरूपपणे बाहेर काढून वाळूने भरलेल्या बंद डब्यामध्ये ठेवण्यात आली. या अंड्यांमधून १० जुलै रोजी २८ सापाची पिल्ले जन्माला आली. त्यांना निसर्गाच्या अधिवासात सोडण्यात आले.

केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजू मुंबईकर आणि पदाधिकारी प्राणी, पशु, पक्षी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी काम करतात. केअर ऑफ नेचर संस्थेचे उलवे नोड अध्यक्ष विकी देवेंद्र यांना उलवे, शिवाजीनगर येथील सिडको उद्यानामध्ये असणाऱ्या दगडांच्या आतमध्ये सापांची अंडी निदर्शनास आली. या वन्य जीवप्रेमी सर्पमित्राने ती सापाची ३० अंडी त्या दगडांमधून बाहेर काढली आणि एका वाळूने भरलेल्या बंद डब्यामध्ये २१ दिवस ठेवली. त्यानंतर त्या अंड्यामधून २८ सापाची पिले जन्माला आली. त्याची माहिती महाराष्ट्र वनविभागाचे उरण विभग परिक्षेत्र अधिकारी कोकरे यांना देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या सापाच्या पिल्लांना निसर्गाच्या अधिवासात जंगलामध्ये सोडण्यात आले.



या कामगिरीबद्दल वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाच्या कार्यात योगदान देणाऱ्या विकी देवेंद्र या सर्पमित्राचे कौतुक केले जात आहे.



**पनवेल : येथील सेंट जोसेफ हायस्कूल 'पर्यावरण संवर्धन' या उपक्रम राबविला गेला. या वेळी भारत विकास परिषदेच्या सचीव पद्मजा कुलकर्णी, महिला सहभागिता डॉ. शिल्पा गोडबोले, प्रांत पर्यावरण प्रमुख कमांडर दिपक जांबेकर, उपाध्यक्ष शिरीष गडकरी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका लिना वर्मा उपस्थित होते.**


## संपादकीय

# शिवरायांचा अनोखा सन्मान

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्रासह भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड-किल्ल्यांना 'युनेस्को'चे जागतिक वारसा स्थळ म्हणून मानांकन मिळाले आहे. हा संपूर्ण देशासाठी अत्यंत अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण ठरला. शिवरायांच्या शौर्याला जागतिक पातळीवरून कुर्निसात करण्यात आल्याचा हा सन्मान विशेष आहे.

**स्वराज्याच्या स्थापनेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सहकाऱ्यांच्या सोबतीने उभारलेले अनेक किल्ले महाराष्ट्रासह भारतात त्यांच्या कार्याची आजही साक्ष देत आहेत. सर्वसामान्यांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी महाराजांनी आपले आयुष्य गनिमांशी लढून वेचले. शत्रूशी लढण्यासाठी त्यांनी अनेक भरभक्कम आणि वैविध्यपूर्ण गड-किल्ले उभारले. त्यापैकी महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील एक अशा एकूण १२ किल्ल्यांना 'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळ यादीत स्थान मिळाले आहे. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी (सर्व महाराष्ट्र) आणि जिंजी (तामिळनाडू) यांचा समावेश होता. या मानांकनासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्यातर्फे प्रस्ताव तयार करण्यात आला होता. शिवकालीन दुर्गांचे सामरिक, स्थापत्य व सांस्कृतिक महत्त्व, सह्याद्रीच्या कुशल वापरातून साकारलेली माची स्थापत्यशैली आणि गनिमी काव्याचे युद्धतंत्र या सर्व बाबी मानांकनाच्या निर्णयामध्ये निर्णायक ठरल्या. या ऐतिहासिक घडामोडीसाठी अनेक शासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे कार्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी 'युनेस्को'च्या महानिदेशकांची भेट घेऊन शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. या ऐतिहासिक यशामुळे मराठा साम्राज्याच्या रणनीतिक, स्थापत्य आणि महत्त्वाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे तसेच सर्व नागरिकांना या किल्ल्यांना भेट देण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ घोषित करण्यात आल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले हे जगाच्या नकाशावर आले आहेत. आता युनेस्कोच्या सर्व संकेतस्थळावर या किल्ल्यांची ऐतिहासिक माहिती उपलब्ध होणार आहे. वर्ल्ड टुरिझम मॅपवर हे किल्ले येणार आहेत तसेच 'युनेस्को'च्या माध्यमातून जागतिक वारसा स्थळ म्हणून सर्व माहिती देण्यात येईल, असे म्हटले. खरंतर महाराजांचे कार्य, त्यांचा जीवनप्रवास, वाटचाल आणि योगदान आपल्या राज्यात आणि देशात सर्वांनाच ज्ञात आहे. आता महाराष्ट्राचे शौर्य, स्थापत्य परंपरा आणि स्वराज्यरचना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अधोरेखित झाली आहे. 'युनेस्को'कडून मिळालेली ही मान्यता म्हणजे केवळ महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवाला अधोरेखित करणारा सन्मान नाही, तर ती पर्यटन, स्थानिक रोजगार, संशोधन आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. महाराष्ट्रातील गडकोटांभोवती स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणारी नवीन अर्थव्यवस्था निर्माण होण्याची दिशा या निर्णयामुळे निश्चित झाली आहे. प्रज्ञाहितदक्ष, जाणता राजा छत्रपती शिवरायांचा हा अनोखा सन्मान म्हणावा लागेल.**

# थोर सामाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर



गोपाळ गणेश आगरकर म्हणजे एक बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावी गरीब घराण्यात झाला. खेळणे, पोहणे, वाचणे यांत त्यांचे बालपण गेले. हालअपेष्टांना तोंड देत कराड, रत्नागिरी, अकोला आणि पुणे येथे राहून ते एमए झाले. अकोल्याच्या विष्णू मोरेश्वर महाजनींचे त्यांना मार्गदर्शन लाभले. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी पुण्यात निर्माण केलेल्या जहाल विचारांच्या राष्ट्रवादी पंथास आगरकर हे लोकमान्य टिळकांसह जाऊन मिळाले. लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी या तिघांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल स्थापन केले (१८८०) तसेच केसरी आणि मराठा (इंग्रजी) ही वर्तमानपत्रे चालू केली (१८८१). न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आगरकरांनी अध्यापनाचे काम केले. त्याचप्रमाणे 'केसरी'च्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी स्थापन केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी अखेरपर्यंत काम केले.

महाविद्यालयीन जीवनातच जेरेमी बेंथम, जॉन स्ट्यूअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि अज्ञेयवादी झालेला होता. याच दृष्टिकोनातून तत्कालीन समाजाची शिलावस्था त्यांना जाचत होती व समाजजागृती करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. 'केसरी'तील त्यांच्या सामाजिक लेखांतून हीच भूमिका व्यक्त होऊ लागली. सामाजिक प्रश्नांच्या जाणिवेपेक्षा राजकीय प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र असली पाहिजे, असे 'केसरी' व मराठाच्या चालकमंडळींस वाटत असल्यामुळे आगरकरांचा वैचारिक कोंडमारा होऊ लागला. परिणामतः ते 'केसरी'तून बाहेर पडले (१८८७) आणि आपल्या क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या प्रतिपादन-प्रसारासाठी सुधारक हे पत्र त्यांनी काढले. त्यात राजकीय व अर्थशास्त्रविषयक लेखही येत.

बुद्धिवादी दृष्टिकोनातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अन्याय्य रूढी आणि परंपरा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. बुद्धीच्या निकषांखेरीज अन्य कोणताही निकष ते मानीत नसल्यामुळे समाजसुधारणांचे समर्थन करण्यासाठी स्मृतिवचनांचा आधार घेणे त्यांना मान्य नव्हते. नीतिमान आणि सदाचरणी समाजाच्या निर्मितीसाठी ईश्वर आणि धर्म यांचीही आवश्यकता त्यांना वाटत नव्हती. परोपकारादी सद्गुण धर्माच्या आधी अस्तित्वात आले असून नंतर धर्मात ते गोवले गेले, अशी त्यांची भूमिका होती. बुद्धिवाद, व्यक्तिवाद, समता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टी, इहवाद आणि मानवतावाद या सप्तःसूत्रीने त्यांचा सारा सामाजिक विचार व्यापलेला आहे. साहजिकच, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांसारख्या कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता आणि चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, ठरवून केलेले विवाह इ. गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. मुला-मुलींस समान शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे, दुष्ट आचारांचे निर्मूलन करावे, सदाचाराचा प्रसार करावा, ज्ञानवृद्धी करावी, सत्यसंशोधन करावी, भूतदया राखावी यासाठी ते प्रयत्नशील होते. मनुष्यजातीचे ऐहिक सुखवर्धन हेच त्यांचे ध्येय बनले होते. तथापि, निव्वळ इंद्रियसुखालाच ऐहिक सुख मानण्याइतपत त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. नीतिमान आणि संयमी जीवनामुळे मनाला लाभणारे समाधानही या ऐहिक सुखात त्यांना अभिप्रेत होते. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे स्वार्थ आणि स्वैराचार फैलावण्याऐवजी समाजातील व्यक्ती परोपकारी आणि परहितचिंतकच होतील, असे त्यांना वाटे. उलट व्यक्तिस्वातंत्र्य न मानणाऱ्या व निरुपयोगी परंपरांनी वेढलेल्या समाजाची केव्हाही प्रगती होऊ शकणार नाही, अशी त्यांची धारणा होती. परंपरांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन ऐतिहासिक होता. त्यामुळे एखादी गोष्ट समाजाच्या एका अवस्थेत उपयुक्त ठरली असेल, हे ते मान्य करीत, मात्र तीच गोष्ट बदलत्या काळात जाचक ठरल्यास बिनदिक्कतपणे टाकून द्यावी, असे ते म्हणत. अशा रूढी आणि परंपरा स्वखुषीने सोडून द्यावयास समाज तयार नसेल, तर त्या सरकारी मदतीने कायदेशीररीत्या नाहीशा कराव्या, असे त्यांचे मत होते. ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टीत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक सुधारणांचे फळ आपणास आयतेच प्राप्त झाले अशा अनेक देशांतील धर्मांचा, रितीरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधीही शोभणार नाही हे त्यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे.

आगरकरांचे विचार तत्कालीन अंधश्रद्ध सामान्यांना समजले नाहीतच. तथापि, टिळकांसारख्या सुशिक्षित आणि चिंतनशील व्यक्तींचाही त्यांना पाठिंबा मिळू शकला नाही. जनतेचे लक्ष समाजक्रांतीवर केंद्रित करून त्यात तिची शक्ती वाया घालवण्यापेक्षा आधी राजकीय स्वातंत्र्यासाठी तिचा उपयोग करून घ्यावा तसेच सामाजिक रूढींच्या प्रश्नावर लोकांची मने दुखवून राजकीय चळवळीत फूट पाडू नये, असे टिळकांना वाटे. ईश्वर आणि धर्म यांच्याविषयीचे आगरकरांचे विचार रा.गो. भांडारकर आणि न्यायमूर्ती रानडे यांसारख्या सुधारक व्यक्तींनाही पटत नसत. सुधारकातील लेखांविरुद्ध चहुबाजूंनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. खुनाच्या धमक्या, प्रेतयात्रा काढणे इ. प्रकार झाले, परंतु 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार', या भूमिकेतून सामाजिक सुधारणांचा कडवा पुरस्कार त्यांनी आमरण चालू ठेवला. सुधारकातील लेखांतून त्यांचे समाजजीवनाच्या विविध अंगांचे सूक्ष्म निरीक्षण आणि सखोल चिंतन प्रत्ययास येते. स्त्री-पुरुषांचा पोषाख, विधवांचे केशवपन, सोवळे-ओवळे, अंत्यविधी आणि अंत्यसंस्कार, केशकर्तन, पायतणे इ. विषय जसे त्यांत आहेत तसेच देवतांची उत्पत्ती, मूर्तिपूजा, आत्म्याची मरणोत्तर स्थिती इत्यादींसारखे तात्त्विक आणि धर्माशी निकटचा संबंध असलेले विषयही आहेत. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांचे संबंध काय असावेत यासंबंधीची आपली भूमिका मांडण्यासाठी आणि समाजहितकारक कायद्यांच्या जोरदार पुरस्कारासाठी काही लेख लिहिले गेले आहेत, तर काही लेखांतून सामाजिक गुलामगिरीने जखडून गेलेल्या स्त्रियांच्या शिक्षणादी समस्यांविषयी मूलगामी विचार आलेले आहेत.

समाजोन्नतीचा ध्यास असल्याने समाजचिंतन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता तसेच राजकीय विचारांच्या जहालपणात ते टिळकांच्या बरोबरच होते. राजकीय हक्क आणि राजकीय स्वातंत्र्य यांची तीव्र जाणीव त्यांच्या लेखांतून स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहे. चिपळूणकर निवर्तल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय विचारजागृती घडवून आणण्याचे काम 'केसरी'तून बाहेर पडेपर्यंत त्यांनीच केले.

आपल्या वैचारिक लेखांनी मराठीतील निबंधसाहित्यात त्यांनी मोलाची भर घातली, पल्लेदार वाक्ये, मुद्देसूद प्रतिपादन, अन्वर्थक अलंकार आणि प्रासंगिक नर्मविनोद ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये. केशवसुत, ह. ना. आपटे यांसारख्या थोर साहित्यिकांवर आगरकरांचा वैचारिक व भाषिक प्रभाव होता. ज्याने आपल्या बुद्धिसामर्थ्याने व साधुत्वाने जगास वश केले, तो खरा शास्ता हे आगरकरांचे म्हणणे त्यांच्या वैचारिक व भाषिक क्षमतेचे निदर्शक आहे. त्यांच्या 'कवि, काव्य, काव्यरति' आणि 'शेक्सपिअर, भवभूति व कालिदास' यांसारख्या साहित्यविषयक निबंधांनी आजच्या काही टीकाकारांचे लक्ष वेधून घेतले असून त्यांनी आगरकरांना साहित्यशास्त्रातील काही मूलभूत तत्त्वांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करणारे विचारवंत मानले आहे. काव्य आणि संवेदना यांचा विशेष संबंध, काव्यातील सत्य आणि शास्त्रीय सत्य, काव्यातील करुणरस, कविमन आणि काव्यनिर्मितिप्रक्रिया इत्यादींसंबंधीचे त्यांचे विचार या दृष्टीने कक्षणीय ठरतात. 'कोल्हापूर प्रकरणा'वरून १८८२मध्ये डोंगरी येथे टिळकांसह कारावास भोगत असतानाचे त्यांचे अनुभव त्यांनी डोंगरीच्या तुरुंगांत खेळकर आणि विनोदी शैलीत सांगितले आहेत. साहित्य अकादेमीनेही त्यांचे काही लेख प्रसिद्ध केले आहेत. यशोदाबाई फडके यांच्याशी विवाहबद्ध झालेल्या आगरकरांना दांपत्यजीवनात दुःख, दारिद्र्य, संकटे आल्याने बौद्धिक वातावरण नसल्याची खंत होती. दम्याच्या विकाराने पुणे येथे ते निधन झाले. **साभार : मराठी विश्वकोष**

## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टवॉच सांगेल तुम्ही गर्भवती आहात की नाही

आता तुमच्या मनगटावर बांधलेले स्मार्टवॉच केवळ फिटनेस ट्रॅक करणार नाही, तर तुम्ही गर्भवती आहात की नाही हेदेखील सांगेल. अलिकडच्या एका अभ्यासात, ॲपल वॉच आणि आयफोन मधून गोळा केलेल्या डेटाच्या मदतीने एक नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वैशिष्ट्य तयार करण्यात आले आहे, जे९२% अचूकतेने गर्भधारणा ओळखू शकते.



हे वैशिष्ट्य ॲपलच्या आगामी स्मार्टवॉचमध्ये पाहता येईल. पलने युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाच्या सहकार्याने एक विशेष एआय वैशिष्ट्य तयार केले आहे, ज्याचे नाव वेअरेबल बिहेवियर मॉडेल (WBM) आहे. हे वैशिष्ट्य ॲपल वॉच आणि आयफोनमधून मिळवलेल्या वर्तनात्मक डेटा (म्हणजे तुमच्या दैनंदिन क्रियाकलापांचा डेटा) वापरते.या डेटाचे विश्लेषण मशीन लर्निंग वापरून केले जाते आणि गर्भधारणेसारख्या आरोग्य स्थिती ९२% अचूकतेने ओळखल्या जाऊ शकतात. एआय वैशिष्ट्य काही सेकंदांऐवजी आठवडे आणि महिन्यांत डेटाचे विश्लेषण करते, जे आरोग्य स्थिती चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करते.


संशोधकांचे म्हणणे आहे की, आरोग्य स्थिती शोधण्यात वर्तणुकीचा डेटा खूप प्रभावी आहे. विशेषतः गर्भधारणा शोधण्यात, WBM आणि PPG डेटाचे संयोजन आश्चर्यकारक सिद्ध झाले आहे. अभ्यासात सहभागी असलेल्या शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की हे तंत्रज्ञान भविष्यात आरोग्य देखरेखीसाठी पल वॉचला अधिक स्मार्ट बनवू शकते.

हे तंत्रज्ञान आपले जीवन कसे बदलेल?

गर्भधारणा ओळखणे: जर हे वैशिष्ट्य ॲपल वॉचमध्ये आले तर महिला घरी बसून त्यांच्या गर्भधारणेचा अंदाज लवकर घेऊ शकतील. हे विशेषतः वैद्यकीय सुविधांपासून दूर राहणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल.

आरोग्य देखरेख: हे वैशिष्ट्य संक्रमण, झोपेच्या समस्या आणि हृदयरोग लवकर शोधू शकते, ज्यामुळे वेळेवर उपचार करणे शक्य होते. या नवीन एआय फीचरसह, पुढील ॲपल वॉचमध्ये प्रेग्नन्सी डिटेक्शन फीचर अधिकृतपणे येण्याची शक्यता आहे. सध्या, ॲपलची वॉच सिरीज १० आणि वॉच अल्ट्रा २ बाजारात उपलब्ध आहेत.

# चौथे सरसंघचालक 'रज्जू भैय्या'



## निमित्त

प्रो. राजेंद्र सिंह, ज्यांना रज्जू भैय्या म्हणून ओळखले जाते, त्यांचा जन्म २९ जानेवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथे झाला. त्यांचे वडील बलबीर सिंह हे भारतीय अभियांत्रिकी सेवेसाठी निवड झालेले पहिले भारतीय होते.

रज्जू भैय्या यांचे प्राथमिक शिक्षण नैनितालमध्ये झाले; नंतर त्यांनी अलाहाबाद विद्यापीठात शिक्षण घेतले. ते भौतिकशास्त्राचे विद्यार्थी होते आणि अणुशास्त्र हा त्यांचा विशेष विषय होता. त्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका भारतीय नोबेल पुरस्कार विजेते डॉ. सी.व्ही. रमन यांनी तपासल्या.असे म्हटले जाते की डॉ. रमण त्यांच्या उत्तरांनी इतके प्रभावित झाले की त्यांनी त्यांना त्यांच्या हाताखाली संशोधन करण्यासाठी आमंत्रित केले. दरम्यान, त्यांना व्याख्याता पदावर नियुक्तीसाठी आमंत्रणही मिळाले. संशोधनाचा प्रस्ताव स्वीकारण्याऐवजी त्यांनी व्याख्याता पद स्वीकारले आणि १९६५ पर्यंत अलाहाबाद विद्यापीठात अध्यापन केले. १९६६ मध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक बनले.

रज्जू भैया नेहमीच सर्व भौतिक सुखांपासून अलिप्त राहिले आणि म्हणूनच त्यांना स्वतःसाठी काहीही नको होते. त्यांनी कमीत कमी कपडे वापरले. त्यांच्या स्वभावामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांच्यासाठी अलाहाबादमधील सिव्हिल लाईन्स येथे एक घर बांधून दिले, परंतु त्यांनी ते सरस्वती शिशु मंदिर या शैक्षणिक संस्थेला दान केले. असेही म्हटले जाते की, त्याच्या वडिलांना आणि कुटुंबातील सदस्यांना कदाचित असे वाटले असेल की रज्जू भैया त्याला मिळणारी प्रत्येक गोष्ट एखाद्या सामाजिक संस्थेसाठी देतील, म्हणून त्याला त्याच्या वडिलांच्या मालमत्तेचा कोणताही वाटा देण्यात आला नाही.

स्वामी चिन्मयानंद यांच्या मते, ते (रज्जू भैया) नेहमीच त्यांच्या कुटुंबापासून अलिप्त राहिले. अलाहाबादमध्ये ते त्याच शिशु मंदिराच्या खोलीत राहत होते. त्यांनी आयुष्यातील बहुतेक काळ संघाच्या कार्यालयात घालवला. ते कोणत्याही बँकेत खातेदार नव्हते आणि त्यांच्याकडे एक इंचही जमीन नव्हती. त्यांच्या स्वभावातील साधेपणा आणि सर्वांशी सौहार्द यामुळे ते त्यांच्या स्वतःच्या शैलीचे माणूस बनले. संघाप्रती त्यांची प्रामाणिकता आणि पूर्ण समर्पण असूनही, राजकीय पक्षांमधील मोठ्या संख्येने लोक त्यांना पसंत करत होते.

सरसंघचालक या प्रतिष्ठित पदासाठी काम करताना ते नेहमीच सर्वांशी सौहार्दपूर्ण होते. शारीरिकदृष्ट्या ते आजारी पडले तरी त्याचा त्यांच्या मनावर आणि बुद्धीवर कधीही परिणाम झाला नाही. ते जिवंत असेपर्यंत सक्रिय राहिले. ते नेहमीच शिक्षण, सेवा, समर्पण आणि विचारांच्या सुसंवादाचे समर्थक होते. म्हणूनच, सरसंघचालक म्हणून त्यांनी घेतलेल्या सर्व निर्णयांमुळे संघाची व्याप्ती वाढण्यास मदत झाली. त्यांच्या उदारमतवादी विचारसरणीला व्यापक पाठिंबा मिळाला.

वय, दर्जा, प्रतिष्ठेचा प्रभाव न पडता, प्रत्येक व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून वागवणे हे त्यांचे पहिले तत्व होते १४ जुलै २००३ मध्ये त्यांचे निधन झाले. (**साभार : इंटरनेट**)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### पाणी पिण्याच्या 'या' चुकीच्या पद्धतींनी होऊ शकतात आजार

पाणी हा जीवनाचा आधार आहे. आपल्या आरोग्यासाठी पाणी पिणे किती महत्त्वाचे आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे, पण तुम्हाला माहीत आहे का की पाणी पिण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे तुम्ही आजारी पडू शकतात? अनेकदा आपण पाणी पिण्याच्या पद्धतीबाबत निष्काळजी असतो, ज्याचा आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



पाणी पिण्याच्या चुका ज्यामुळे तुम्ही आजारी पडू शकता: १. एकाच वेळी जास्त पाणी पिणे: एकाच वेळी जास्त पाणी पिणे शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडू शकते. यामुळे डोकेदुखी, उलट्या, चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

२. अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे : अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनक्रिया मंदावते आणि पोटात जडपणा येतो.

३. थंड पाणी पिणे: थंड पाणी प्यायल्याने पचनसंस्थेमध्ये समस्या उद्भवू शकतात आणि पोटदुखी, अपचन आणि गॅसची समस्या होऊ शकते.

४. गरम पाणी पिणे: खूप गरम पाणी प्यायल्याने घशाची जळजळ आणि अल्सर होऊ शकतात.

५. प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवणे: प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवल्याने प्लास्टिकचे कण पाण्यात मिसळतात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

६. घाणेरडे पाणी पिणे: घाणेरडे पाणी पिल्याने अतिसार, टायफॉइड, कॉलरा इत्यादी अनेक आजार होऊ शकतात.

पाणी पिण्याची योग्य पद्धत :

१. पाणी हळूहळू प्या: लहान घोटात पाणी प्या, जेणेकरून शरीर ते सहजपणे शोषू शकेल. २. जेवल्यानंतर अर्ध्या तासाने पाणी प्या : जेवण केल्यांनतर अर्ध्या तासाने पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. ३. थंड पाणी कमी प्या: कमी थंड पाणी प्या आणि सामान्य तापमानाचे पाणी प्या. ४. कमी गरम पाणी प्या: खूप गरम पाणी पिणे टाळा. ५. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवा: प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवणे टाळा. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटलीत पाणी ठेवा. ६. उकळलेले पाणी प्या: घाणेरडे पाणी उकळून प्या, त्यामुळे त्यात असलेले हानिकारक बॅक्टेरिया नष्ट होतात.

पाणी पिण्यातील चुका तुम्हाला आजारी बनवू शकतात, त्यामुळे या चुका टाळा आणि पाणी पिण्याच्या योग्य पद्धतीचा अवलंब करा.

# रायगड जिल्ह्याचा रँचो: जिल्हा परिषद शिक्षकाने बनविले क्रांतीकारी शैक्षणिक ॲप

**पाली : प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणातही नवनवीन क्रांती घडत आहे. याच क्रांतीचा एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कांटी चे प्राथमिक शिक्षक शरद बबन घुले यांनी इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी अभिनव आणि अत्यंत उपयुक्त शैक्षणिक ॲप्स विकसित केले आहेत.

रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांच्या हस्ते, शरद घुले यांनी तयार केलेल्या शैक्षणिक ॲपसाठी नुकताच विशेष सत्कार करण्यात आला.





मुलांच्या बौद्धिक आणि मानसिक क्षमतांचा सखोल विचार करून तयार केलेले हे ॲप्स शिक्षण प्रक्रिया अधिक आनंददायक, सुलभ आणि प्रभावी बनवत आहेत. सध्या त्यांची १, ४ आणि ५ वी ची ॲप्स प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत, तर २ री आणि ३ री ची ॲप्स चाचणी टप्प्यात आहेत. पारंपरिक शिक्षणापेक्षा या ॲप्समुळे मुलांना शिकण्यात अधिक मजा येते. यामुळे त्यांची शिकण्याची आवड वाढते आणि ते स्वयं-अभ्यासासाठी प्रवृत्त होतात.

जिल्हा परिषद शाळांतील बहुतांश शिक्षक प्रयोगशील व नवोपक्रमशील आहेत. व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ते नवनवीन शैक्षणिक साधणतंत्र व उपक्रम बनवतांना दिसतात. शरद घुले यांनी विकसित केलेल्या या प्समध्ये अनेक नाविन्यपूर्ण वैशिष्ट्ये आहेत, जी त्यांना इतर पारंपरिक शैक्षणिक साधनांपेक्षा वेगळे ठरवतात. मोबाईल व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण मनोरंजक व आनंददायी करणारे हे ॲप मुलांच्या व पालकांच्या पसंतीस उतरेल आहे. ग्रामीण व शहरी भागातील मुलांच्या अध्यनानासाठी ते उपयुक्त व प्रभावी आहे. ही ॲप्स विद्यार्थ्यांना शिक्षणाकडे आकर्षित करणारे माध्यम आहे. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक व पालकांसाठी देखील उपयुक्त आहेत.

एका जिल्हा परिषद शिक्षकाने, मुलांच्या गरजा आणि प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव लक्षात घेऊन तयार केली आहेत. त्यामुळे ती अधिक व्यावहारिक आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत. ही ॲप्स प्ले स्टोअरवर सहज आणि मोफत उपलब्ध असल्यामुळे ती सर्वांना परवडणारी आहेत. यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होते. शरद घुले या ॲप्समध्ये सतत सुधारणा व अपडेट करत आहेत.

### ॲप्सची वैशिष्ट्ये

***या सर्व ॲप्सचा वापर अत्यंत सोपा असून, लहान मुलेही ती सहजपणे हाताळू शकतात. इंटरफेस अत्यंत यूजर-फ्रेंडली असल्याने पालकांनाही मुलांना ॲप्स वापरण्यासाठी मदत करावी लागत नाही. प्रत्येक वेळी ॲप उघडल्यावर किंवा नवीन सराव करताना विद्यार्थ्यांना नवीन प्रश्न मिळतो. यामुळे घोकंपट्टी न होता, मुलांना संकल्पना समजून घेण्यास मदत होते. पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठीचे शिष्यवृत्ती ॲप हे विशेषत्वाने उल्लेखनीय आहे. या ॲप्सबद्दल अधिक माहितीसाठी आणि ती डाउनलोड करण्यासाठी आपण प्ले स्टोअरवर खालील लिंकला भेट देऊ शकता. ॲप लिंक*** https://play.google.com/store/apps/developer?id=Jyoti+Ghule

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**रेवदंडा :** मुरूड तालुक्यातील सार्तिडे राजिप शाळेत विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आनंदी फांउडेशनच्या स्तुत्य उपक्रमातून अशोक तावडे व आदिती तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी अमृता म्हात्रे व प्रिती म्हात्रे यांची उपस्थिती होती.

## रायगड जिल्हा मच्छीमार सोसायटीचा सन्मान

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा मच्छिमार मध्यवर्ती सहकारी संघ लिमिटेड रायगड या संस्थेने सन २०२४-२५ या वर्षात मत्स्यव्यवसायात' उत्कृष्ट काम तसेच मासळीचे वितरण व विक्री या क्षेत्रात काम केल्याबद्दल त्याचं राष्ट्रीय मत्स्यशेतकरी दिनानिमित्त राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड हैद्राबाद, यांच्या प्रचार व प्रसार सस्थेमार्फत सन्मानपत्र पत्र देऊन गौरविण्यात आले.



यावेळी राज्यसभा खासदार नितीनजी पाटील ,भा.प्र.से. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, भा.प्र.से जितेंद्र डूडी, आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई किशोर तावडे ,रायगड जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील , उपाध्यक्ष मनोहर बैले, उपाध्यक्ष, संचालक धनंजय देशमुख ,सचिव राजेंद्र गावडे आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

रायगड जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी संस्था तथा मुरुड सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटी चेअरमन उपाध्यक्ष मनोहर बैले आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की रायगड जिल्हा मच्छीमार मध्यवर्ती सहकारी सोसायटी ही गेले ६१ वर्षे मच्छीमार कोळी बांधवांन साठी काम करित आहे. या व्यवसाय क्षेत्रात उद्योगांच्या समूहासह उत्पादन, प्रक्रिया व विक्री वाढविण्यासाठी विविध घटकांना एकत्र आणून अधिक चांगले उत्पन्न मिळवण्यासाठी मदत करतात

येथे मत्स्यव्यवसायाची स्थापना करून मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा विकास साधता येईल. एकंदरीत, मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी एक महत्वाचे साधन आहे, जे उत्पादन, प्रक्रिया, आणि विक्री यांसारख्या विविध स्तरांवर सुधारणा करण्यास मदत होणार आहे. मत्स्य उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रामुख्याने मासे उत्पादक गटांची संघटना स्थापन करून मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्था विकसित करू याचबरोबरीने उत्पन्नाचे स्त्रोत शोधून भर दिला जाणार आहे.

## रेवदंडा पारनाक्यावरील खड्डे भरले

**रेवदंडा :** रेवदंडा पारनाका नजीकच्या वळण रस्तावर अपघातास निमत्रंण असलेले मोठे खोलगट आकाराचे खड्डे सामाजीक कार्यकर्ते संतोष (बाबू) मोरे यांनी स्वखर्चाने सिमेंट कॉंक्रिटीकरणाने भरण्यात आले. रेवदंडा पारनाका नजीकच्या वळणावर दोन मोठे आकाराचे खड्डे ऐन पावसाळयात पडले होते. हे खड्डे लवकरात लवकर भरण्यात यावे, असे आवाहन सर्व स्तरातून होत होते.



सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत येत असलेल्या रेवदंडा पारनाक्यावरील या मुख्यः रस्तावरील खड्डे भरण्यास सार्वजनिक बांधकाम खाते दुर्लक्ष करत होते. त्यामुळे स्थानिक सामाजीक कार्यकर्त्यानी हे खड्डे भरावे असे आवाहन प्रवासीवर्गाने केले होते. प्रवासीवर्ग व लोकांची मागणी व खड्ड्याने अपघातास निमत्रंण असल्याने रेवदंडा येथील सामाजीक कार्यकर्ते व वैष्णवी कंस्ट्रशनचे संतोष मोरे यांनी स्वखर्चाने सिमेंट कॉक्रिटीकरणाने खड्डे भरले. प्रवासीवर्ग तसेच वाहन चालकांनी संतोष मोरे यांचे आभार मानले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या शेत जमीन मिळकतीचे सातबारा सदरी भोगवटादार म्हणून श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर तसेच इतर हक्कात उषा अशोक पाटील व इतर यांचे नाव नोंदविलेले आहे. सदर मिळकतीमध्ये श्री. माया तुकाराम गडकरी व इतर या माझे अशिलांची देखील त्यांचे पुर्वगामी कै, काना चांगो पाटील यांचेनंतर कसवणुक असुन सदर मिळकतींमध्ये भोगवटादार म्हणून नाव असलेले श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर तसेच इतर हक्कात नाव असलेले उषा अशोक पाटील व इतर यांचे बरोबरच माझे अशिल श्री. माया तुकाराम गडकरी व इतर यांचा देखिल कै. काना चांगो पाटील यांचे वारस म्हणुन त्यांचेही हक्क, हितसंबंध आहेत. सदर मिळकत ही वडिलोपार्जित स्वरूपाची असून त्यामध्ये माझे अशिलांचा देखील हक्क व हितसंबंध निर्माण झालेले आहेत.

माझे अशिलांना हे खात्रीलायकरित्या समजले आहे की भोगवटादार म्हणून नाव असलेले श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर तसेच इतर हक्कात नाव असलेले उषा अशोक पाटील व इतर हे संगनमत करुन सदर मिळकत त्रयस्थ इसमास विकणेच्या प्रयत्नात आहेत. सदर व्यवहाराबाबत भोगवटादार म्हणून नाव असलेले श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर तसेच इतर हक्कात नाव असलेले उषा अशोक पाटील व इतर यांनी माझे अशिलांची संमती घेतलेली नाही. त्यामुळे माझे अशिलांस वगळून सदर मिळकतीचा व्यवहार करणेचा घाट श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर यांनी घातला आहे अशी माझे अशिलांची खात्री पटलेली आहे. सदर मिळकत हि वडीलोपार्जित स्वरूपाची असलमुळे जरी सदर मिळकतीचे ७/१२ सदरी माझे अशिलांचे नाव लावलेले नसले तरी देखील कै. काना चांगो पाटील यांचे वारस म्हणून माझे अशिलांचा सदर मिळकतीमध्ये हिस्सा व हक्क हितसंबंध आहेत.

सबब, माझे अशील या जाहीर नोटीसीद्यारे असे जाहीर करत आहेत की, सदर मिळकतीबाबत श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर हयांच्या सोबत व्यवहार करणेपुर्वी इच्छुक खरेदीदारांनी माझे अशीलांशी देखील संपर्क करून सदर व्यवहारांमध्ये त्यांस सामील करावे. असे न झाल्यास माझे अशीलांस वगळून केलेला कोणताही व्यवहार माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, आणि सदर व्यवहाराबाबत विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे माझे अशीलांस भाग पडेल आणि त्याचे परिणामांस श्री. श्रीकांत चंद्रकांत गडकरी व इतर तसेब इच्छुक खरेदीदार जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | एकूण क्षेत्र (हे.आर.पा.) | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १४० | ०-४८-५० | ३.४३ |
| १४१/६ | ०-३०-२० | ४.७५ |

**पनवेल**
**दिनांक:- १३/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर श्री. कुलकर्णी**
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं, १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृह जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६


## पाक कला स्पर्धेतून महिलांच्या कलेला वाव मिळावा -ना.आदिती तटकरे

**तळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तळा शहरातील गो.म.वेदक विद्यामंदिर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माध्यमातून महिलांसाठी तालुकास्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत महिलांनी कोकणात पिकणाऱ्या वस्तूंपासून विविध प्रकारचे पदार्थ बनविले होते.या स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की महिलांची पाककला केवल घरापूरती मर्यादित न राहता त्यांच्या कलेला वाव मिळावा या हेतूने तसेच यानिमित्ताने महिलांना एकत्रित येण्याची संधी मिळते व त्यांना प्रोत्साहन मिळावा या हेतूने या पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. असे त्या म्हणाल्या.

या पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ८०००रु. चैत्राली तावडे यांनी पटकावले.द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक ५०००रु. प्रगती चव्हाण यांनी तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ३०००रू.सरीता चांडीवकर यांनी पटकावले. व उत्तेजनार्थ धनश्री हाटकर व रूबीना परदेशी यांना प्रत्येकी २०००रु मिळाले.या यशस्वी महिलांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले परीक्षक म्हणून तळा तालुक्यातील पिटसई येथिल प्रसिद्ध शेफ भूपेश पवार यांनी परीक्षण केले.

सदर प्रसंगी नगराध्यक्षा माधूरी घोलप,उपनागराध्यक्ष चंद्रकांत रोडे, तहसिलदार स्वाती पाटील ,राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष नाना भौड महिला तालुका अध्यक्षा जान्हवी शिंदे,माजी पंचायत समिती सभापती अक्षरा कदम,रायगड जिल्हा परिषदेच्या माजी महिला व बाल कल्याण सभापती गीता जाधव, शहर अध्यक्षा मेघा सुतार जगदीश शिंदे,नागेश लोखंडे,माजी नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर यांसह सर्व नगरसेविका व तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धामुळे महिलांना प्रोत्साहन मिळून आपणही काहीतरी करू शकतो.अशा प्रकारचा विश्वास निर्माण होत आहे.या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला .

## नवी मुंबई बससेवा कर्जतच्या पश्चिमेकडून लवकरच सुरू होणार

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या काही काळात अनेक नागरिकांनी तक्रार केली होती की कर्जत ते वाशी जाण्यासाठी त्यांना कर्जत पूर्वे मधील एस.टी. डेपोवर जावे लागते, जो बाजारपेठ, मुद्रे, वेस्ट भागातील लोकांपासून दोन ते अडीच किलोमीटर दूर आहे. नागरिकांना रिक्षाने जावे लागते किंवा लांब पर्यंत चालावे लागते. जे विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी फारच त्रासदायक ठरत आहे. हा त्रास कमी व्हावा म्हणून भाजपा किसान सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी नवी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे नवी मुंबई बस सेवा कर्जतच्या पश्चिमे कडून सुटण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

ही समस्या सोडवण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आणि सांगितले की कर्जत वेस्टमधूनच बस सेवा सुरू करण्याचा विचार केला जाईल. विशेष म्हणजे आयुक्त यांच्या चर्चे नंतर दुसऱ्याच दिवशी नवी मुंबई महापालिकेचे परिवहन अधिकारी स्वतः कर्जत येथे पाहणीसाठी आले आणि या बस सेवेचे नियोजन अधिक चांगल्या पद्धतीने कसे करता येईल याचा आढावा ते घेत आहेत. लवकरच कर्जत वेस्टहून नवी मुंबईसाठी थेट बस सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे,




### जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिल कै. परशुराम कृष्णा पिंगळे यांचे वारसदार १) श्री. केशव परशुराम पिंगळे २) श्री. बबन परशुराम पिंगळे ३) श्रीमती लीलाबाई जनार्दन पिंगळे ४) श्री. संजू जनार्दन पिंगळे ५) श्री. आर्केश बळीराम पिंगळे ६) श्री. रुपेश बळीराम पिंगळे ७) सौ. वर्षा मंगेश खंडागळे यांचे वतीने या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल हे मुळपुरुष कै. परशुराम कृष्णा पिंगळे यांचे वारसदार आहेत. कै. परशुराम कृष्णा पिंगळे कुळ कायद्यांतर्गत प्राप्त खालील नमूद मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - हातनोली, तालुका-खालापुर, जिल्हा-रायगड**

| सर्व्हे क्र | हिस्सा क्र | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७२ | ३ ई | ०.११.००<br>पो ख ०.११.००<br>एकूण ०.२२.०० | ०.१४ |

वर नमूद मिळकत सन १९४८ च्या पूर्वीपासून ताबेकब्जात आणि वहिवाटीत होती. त्यानुसार बाळासाहेब पांडोजीराव देशमुख हे सावकार आणि कै. परशुराम कृष्णा पिंगळे हे कुळ बनले. कै बाळासाहेब पांडोजीराव देशमुख यांचे वारसदार श्रीमती मालतीबाई बाळासाहेब देशमुख व शशिकला अशोककुमार काकडे यांनी आमचे अशिलांचे अपरोक्ष उपरोक्त मिळकतीची विक्री करून मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न बेकायदेशीररित्या केला आहे. अनाधिकाराने झालेला नोंदणीकृत दस्त क्रमांक दस्त क्र. १३३३/२०१५ दुय्यम निबंधक कार्यालय, खालापूर आणि त्यापुढे झालेला दस्त क्र. ४८८४/२०२३ पूर्णपणे प्रभावहीन अर्थशून्य आणि निरर्थक आहेत. सबब भोगवटादार सदरी अर्चना सिंग कदान यांचे नाव नमूद असले तरी त्या सदर मिळकतीच्या मालक नाहीत. आमचे अशिल नमूद दस्त रद्द करणे कामी मे. दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणार आहेत आणि फसवणूकीच्या आरोपाखाली फौजदारी स्वरूपाची कारवाई सुरू करणार आहेत तसेच स्वतःचे नाव कुळ म्हणून नोंदवण्याची कार्यवाही सुरू करणार आहेत याची सर्वांनी सक्त जाणीव ठेवावी. कुळ कायद्यांतर्गत प्राप्त मिळकतीमध्ये स्वतःचा न्याय्य व कायदेशीर हक्काचा रक्षणाकरिता आमचे अशिल न्यायालयीन प्रक्रियेचा अवलंब करणार आहेत. सबब कुणीही व्यक्ती अथवा संस्थेने वरील मिळकतीमध्ये, कोणत्याही प्रकारचा ताबा कब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, गहाणखत, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा, लिज, दान, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध निर्माण करू नये. असे कोणतेही हक्कहितसंबंध पूर्वी निर्माण झालेले अथवा भविष्यात निर्माण होणारे हक्क हितसंबंध आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दिनांक:- १४/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. माधुरी राजन थळकर**
ऑफिसः शॉप क्र.१, साई प्रसाद सी.एच.एस.प्लॉट नं. ९८/२, नित्यानंद मार्ग, पनवेल-४१०२०६


## कर्जतच्या श्रीराम पुलावर उगवली झाडे, वाहनांना धोका



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील उल्हास नदीवर असलेल्या श्रीराम पुलावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे उगवत असतात. त्या झाडे झुडपांनी डोके वार काढले असून पुलावरून वाहतील करणाऱ्या वाहनासाठी ही झाडे डोकेदुखी ठरत आहेत. तसेच या जुन्या पुलाला या झाड झुडपांमुळे धोका होऊ शकतो. या प्रकारामुळे वाहतूक कोंडी सुद्धा होते.

उल्हास नदीवरील श्रीराम पुलावर बाजूला प्रचंड झाडी उगवली आहेत. ती झाडे आता पुलावर लोंबकळत असून त्यामुळे वाहनांसाठी हा भाग धोकादायक बनला आहे. त्यामुळे दरवर्षी अशा झाडांना मुळांपासून काढून टाकण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विकास चित्ते करीत असतात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा हा पूल असून त्यांच्या विभागाने ती झाडे झुडपे बाजूला करण्याची महत्वाची जबाबदारी असताना बांधकाम विभागाकडून कर्जत नगरपरिषदेकडे बोट दाखवले जाते. सातत्याने मागणी करुनही संबंधित विभागाकडून काम होत नाही.त्यात त्या झाडांमुळे पुलाचे खांब यांना देखील धोका निर्माण होऊ शकतो हे लक्षात घेऊन तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने ती झाडे खान असतानाच बाजूला करावी अशी मागणी विकास चित्ते करीत असतात,मात्र त्या मागणीकडे शासन यंत्रणा लक्ष देत नाहीत.

पुलावरील झाडांच्या फांद्या आता रस्त्याकडे झुकल्या असून त्याचा परिणाम रस्त्यावर जाणाऱ्या दुचाकी यांच्यासाठी त्या फांद्या धोका निर्माण करीत आहेत.त्यामुळे त्या फांद्या आणि ती झाडे नष्ट करावीत आणि पुल भक्कम राहील याची काळजी घ्यावी.


## PANVEL MUNICIPAL CORPORATION

**E-TENDER NOTICE**
**TRANSPORT DEPARTMENT**

Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel invites tender through E-tendering system from competent bidders for "Selection of Program Management Consultant for Preparation of Detailed Project Report and Management Plan and Implementation of Municipal Bus Service in Panvel Municipal Corporation (PMC)". The blank forms and the detailed information regarding tender will be available on the website www.mahatenders.gov.in from 14/07/2025 to 23/07/2025 up to 3.00 PM

**Outward No- PMC/Vehicle/28-25/Sr.No.05/244/2025**
**Date 11/07/2025.**

**Sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**
**Panvel**

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.३२०/३३३/२०२५
दिनांक :- १४/०७/२०२५

# नवी मुंबईत रेड स्पॉट स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वजनिक ठिकाणी भिंती, पदपथ यांच्या कॉर्नरवर थुंकण्याच्या नागरिकांच्या सवयींमुळे होणारी अस्वच्छता दूर करण्याकडेही व नागरिकांना या सवयीपासून परावृत्त करण्यासाठी 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये रेड स्पॉट (लक्षवेधी भाग) निर्मूलन उपक्रम राबविण्यात आला.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार या अभियानामध्ये दररोज वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये आज अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे आणि परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपायुक्त संजय शिंदे यांच्या माध्यमातून विशेषत्वाने रेल्वे स्टेशन परिसर व सार्वजनिक जागी रेड स्पॉट स्वच्छता मोहीमा नागरिकांच्या उत्साही सहभागातून यशस्वीपणे राबविण्यात आल्या.

यामध्ये ठिकठिकाणी 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानाचे पोस्टर्स दाखवून नागरिकांमध्ये सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने कुठेही न थुंकण्याविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच तशा प्रकारच्या रेड स्पॉटची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या अंतर्गत नेरुळ विभागात बसडेपो ते रेल्वे स्टेशन परिसरातील रेड स्पॉटची पाणी मारून सफाई करण्यात आली. तुर्भे विभागातही सेक्टर २६ कोपरी परिसर आणि जनता मार्केट परिसरात रेड स्पॉट स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. घणसोली विभागातही रेल्वे स्टेशन परिसर, रिक्षा स्टँड, पानटपरी याठिकाणी सेक्टर १ ते ३ परिसरातील रेड स्पॉटवर स्वच्छता मोहीम हाती घेऊन परिसर स्वच्छ करण्यात आला.

ऐरोली रेल्वे स्टेशन व परिसर ३ याठिकाणी आयोजित केलेल्या रेड स्पॉट स्वच्छता मोहीमेत नागरिकांनी उत्साही सहभाग घेतला. रेल्वे स्टेशन्सवरील स्वच्छतेमध्ये सिडकोमार्फत रेल्वे स्टेशन्स सफाईसाठी नियुक्त स्वच्छताकर्मीही सहभागी झाले होते. इतरही विभाग कार्यालय क्षेत्रात तेथील सहा.आयुक्त व स्वच्छता अधिकारी यांच्या माध्यमातून रेड स्पॉट स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

# पुनाडे गावातील स्मशानभूमीसाठी आमदार निधीतून १५ लाख



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पुनाडे येथे आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून आणि महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अध्यक्ष रवी भोईर यांच्या प्रयत्नातून पंधरा लाखाचा भरघोस निधी स्मशान भूमीसाठी देण्यात आला.

या कामासाठी बुथ अध्यक्ष संदेश पाटील आणि ग्रामपंचायत सदस्य पुनाडे रसिक पाटील, पुनाडे भाजप पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भरपूर प्रयत्न केले. या कामासाठी उरण पूर्व अध्यक्ष शशिकांत पाटील यांनीसुद्धा पाठपुरावा केला.

या वेळी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर, ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, सारडे ग्रामपंचायत सरपंच रोशन पाटील, माजी सरपंच पिरकोन व विद्यमान सदस्य के. वाय गावंड, पुनाडे ग्रामपंचायत सदस्य रसिक पाटील, पुनाडे, गावाध्यक्ष लवेश पाटील, पुनाडे बूथ अध्यक्ष संदेश पाटील, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, कळंबुसरे गाव अध्यक्ष राजेश पाटील, ज्येष्ठ नेते रूपेश पाटील, ग्रामपंचायत पुनाडे माजी सरपंच सुभाष पाटील, अमीर ठाकूर, मंगेश पाटील, जगदीश ठाकूर, जयवंत पाटील, निकेतन पाटील आदी उपस्थित होते.

# कोंढरीपाडा येथे पथदिव्याचे लोकार्पण

**उरण : बातमीदार**

कोंढरीपाडा ट्रान्सफॉर्मर डीपी ते कासवलेपाडा सार्वजनिक शौचालय या मुख्य रस्त्यावर गेल्या ३५ वर्षांपासून लाईटची कोणतीही व्यवस्था नव्हती. स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनंतर, ग्रामपंचायत सदस्या प्रमिला म्हात्रे आणि शिवसेना चाणजे विभागप्रमुख अक्षय म्हात्रे यांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला व त्याप्रमाणे ग्रामपंचायत चाणजे यांच्याकडे पत्राद्वारे ठराव मंजूर करून घेण्यात आला.

या कामासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे व शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख अतुल भगत यांचे विशेष सहकार्य लाभले. सिडकोच्या निधीतून १० जी.आय. पाईप लाईट पोल बसवून काम पूर्ण करण्यात आले असून, नुकतेच या रस्त्यावरील लाईटचे लोकार्पण शिवसेना तालुका प्रमुख दिपक ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले.त्याप्रसंगी बोलताना त्यांनी या कामाचे कौतुक करून, भविष्यात या गावासाठी चांगला निधी देऊन पक्षातर्फे अधिकाधिक कामे केली जातील असे प्रतिपादन केले.



या वेळी विधानसभा संपर्कप्रमुख रमेश म्हात्रे, माजी सभापती व तालुका संघटक चंद्रकांत पाटील, उपतालुका प्रमुख प्रशांत पाटील, चाणजे उपविभाग प्रमुख महेश पाटील, बांधकाम कामगार संघटना उपतालुका प्रमुख महेंद्र घरत, प्रभारी शहरप्रमुख सुनील भोईर, युवासेना पूर्व उपविभाग प्रमुख भारत पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्रमिला म्हात्रे व महेश म्हात्रे, ज्येष्ठ शिवसैनिक रवींद्र म्हात्रे, राजेश कोळी तसेच अनेक महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# दिवाळेत बर्फ निर्मिती उद्योगाचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाड्यात स्थानिक मासेमारी व्यवसायाला चालना देण्यासाठी भारत सरकारच्या राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाच्या योजनेंतर्गत स्वतंत्र बर्फ निर्मिती उद्योग प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आले.

मासे सुरक्षित ठेवण्यासाठी बर्फाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. ही गरज लक्षात घेता स्थानिक मच्छिमार राम कोळी यांनी गोवर्धनी फूडच्या माध्यमातून या उद्योगाची निर्मिती केली आहे.



या कार्यक्रमावेळी माजी नगरसेविका भारती कोळी, जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, 'डोलकर मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष तुकाराम कोळी, फगवले मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष अनंता बोस, गव्हाण मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, सुरेश कोळी, ज्ञानेश्वर घरत, कुमार कोळी, रामा भगत, श्रावण घरत, कविता कोळी, सुनीता कोळी, प्रमिला कोळी, लक्ष्मी कोळी यांच्यासह दिवाळे ग्रामस्थ उपस्थित होते.

# तरुण बेपत्ता

**पनवेल** : खांदा कॉलनी सेक्टर ९ येथील बहिणीच्या घरातून राहत्या घरी जातो असे सांगून निघून गेलेला ३४ वर्षीय राजू सामसिंग परिहार हा त्याच्या घरी परत न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्याचा चेहरा गोल व रंग काळा व उंची सहा फूट असून उजव्या हातात कडा आणि अंगात काळा टी-शर्ट व पांढरी पॅन्ट आहे. त्याला हिंदी, नेपाळी भाषा बोलता येते. याबाबत माहिती असल्यास हवालदार प्रीती घरत यांच्याशी संपर्क साधावा.



# नवीन पनवेल आम्रपाली बुध्द विहार येथे वर्षावास कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत नवीन पनवेल सेक्टर ९ येथे प्रकाश बिनेदार आम्रपाली बुध्द विहार या ठिकाणी गुरुवारी बुध्दगया प्रतिष्ठान आणि भारतीय बौध्द महासभा, विभाग क्र. १४, नवीन पनवेल यांच्या वतीने वर्षावास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी प्रसिध्द धम्म प्रवचनकार कल्पेश कांबळे यांनी वर्षावासाच्या तीन महिन्याच्या काळात आपल्याला बौध्द धम्माविषयी अधिक आणि सखोल माहिती मिळण्याची सुवर्णसंधी असते. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी असे वर्षावासाचे कार्यक्रम असतात त्या त्या ठिकाणी बौध्द उपासक-उपासिकांनी आवर्जुन उपस्थित राहून धम्माविषयीची माहिती मिळवून घ्यावी आणि त्याची नोंद करुन ठेवावी, असे आवाहन केले.

हा कार्यक्रम माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे झाला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यास सुजीत खंडीझोड, अमोल जाधव, ॲड. शिवकुमार कांबळे, ॲड. अक्षय मिसाळ, संतोष म्हस्के, अशोक मिसाळ, सुभाष कांबळे, प्रकाश सोनावले आदिंनी मेहनत घेतली.

कार्यक्रमानंतर संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यावतीने भोजनदान देण्यात आले. वर्षावासाच्या तीन महिन्याच्या काळातील प्रत्येक गुरुवार व प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशी विहारात सलग वर्षावासाचे कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. या सर्व कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचे आवाहन माजी नगरसेवक व संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सर्वांना केले आहे.






**पनवेल : अरुणशेठ भगत यांची भाजपचे राज्य परिषद सदस्यपदी झाल्याबद्दल सुभाष पाटील व यतिन पाटील यांनी अभिनंदन केले. सोबत उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी.**

## मोफत वह्यावाटप



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे महापालिका गुजराती प्राथमिक शाळा क्रमांक ९ येथे मोफत वह्या वाटप कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमावेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, शाळेतील मुख्याध्यापिका वैशाली संजय त्रिवेदी, सहशिक्षिका डिंपल ठक्कर, श्वेता मर्गज, मोसमी घोडके आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील तीन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

२०२४-२५ मध्ये संपन्न झालेल्या शालेय स्तरावरील पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेत (पाचवी स्तर) वैष्णव सचिन देशमुख हा विद्यार्थी १८० प्राप्त गुणांसह व जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये १९२ व्या क्रमांकासह ग्रामीण स्तरातून शिष्यवृत्तीधारक ठरला तर पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (आठवी स्तर) प्रतिक्षा ज्ञानेश्वर कोळी ही जिल्हा गुणवत्ता यादी मध्ये ७० वा क्रमांक तर वेद कल्पेश घरत जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये ११४ व्या क्रमांकासह ग्रामीण स्तरातून शिष्यवृत्तीधारक ठरले.

या तिन्ही विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुण भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी यांचे सह विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले आदींनी अभिनंदन केले. विद्यालयातील इयत्ता पाचवी व आठवी स्तर शिष्यवृत्ती विभागाच्या प्रमुख अनुक्रमे संपदा म्हात्रे व द्रौपदी वर्तक यांचेसह अन्य मार्गदर्शक शिक्षकांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# महिलांसाठी कायदेविषयक सल्ला केंद्र

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत बेलापूर भवन, से.११, सी.बी.डी. बेलापूर तसेच ऐरोली विभाग कार्यालय, से.३, ऐरोली, नवी मुंबई या ठिकाणी मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहे. या सल्ला केंद्रामध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आर्थिकदृष्टया दुर्बल तसेच गरजू महिलांवर होत असलेले अत्याचार, त्यांच्या कौटुंबिक व आर्थिक बिकट परिस्थितीबाबत मोफत कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आर्थिकदृष्टया दुर्बल तसेच गरजू महिलांनी समाज विकास विभाग कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन इमारत, १ला मजला, से.११, सी.बी.डी., बेलापूर येथे अथवा ऐरोली विभाग कार्यालय, तळमजला, से.३, ऐरोली येथे मोफत कायदेविषयक सल्ला केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# तक्का कॉलनीतील राजस्थानी स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघिलकर यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकतेच तक्का कॉलनीतील राजस्थानी स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, मा. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.



या कार्यक्रमाअंतर्गत तक्का कॉलनीतील राजस्थानी स्मशानभूमी परिसरात पनवेल महानगरपालिकेतील उद्यान विभाग आणि सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघिलकर यांच्या मार्फत देव चाफा, जांभूळ, पेरू, चिकू, बहावा, सुपारी अशा विविध प्रकारच्या २१ वृक्षांचे रोपण करण्यात आले.

आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, अशोक मुने तसेच सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड व गजलक्ष्मी आंबे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# दक्षिण रायगडला गुटखा पुरविणारा म्हसळ्याचा गुटखा माफिया फरार

**श्रीवर्धन : बातमीदार**

संपूर्ण दक्षिण रायगड जिल्ह्याला गुटखा पुरविणारा गुटखा माफिया म्हसळा तालुक्यातील असून पोलिसांच्या भीतीने तो सध्या फरार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. महाड तालुक्यातील बिरवाडी परिसरात काही दुकान चालक गुटखा विकताना सापडले होते. श्रीवर्धन तालुक्यातदेखील गुटख्याची मोठ्या प्रमाणावर अनेक वर्ष विक्री चालू असल्यामुळे या ठिकाणची तरुण पिढी गुटख्याच्या व्यसनाच्या अधीन झाली होती. तसेच खेडेगावातील महिला वर्गदेखील गुटखा खाऊ लागला होता.

याबाबत श्रीवर्धन तालुक्यातील पत्रकारांनी सातत्याने आवाज उठवल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातून गुटखा विक्री काही प्रमाणात बंद झालेली आहे. काही ठिकाणी चढ्या भावाने व अतिशय गुप्तपणे विक्री केली जात असल्याचे बोलले जात आहे. महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिरवाडी गावाच्या परिसरामध्ये काही दुकानदार गुटखा विक्री करत असल्याबाबतची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता गुटखा विक्री करणारे व्यापारी आढळून आले.

त्यांच्या कडून गुटखादेखील हस्तगत करण्यात आल्याची बातमी होती. व्यापारांनी म्हसळा येथील एक मोठा व्यापारी आम्हाला गुटखा पुरवतो असे सांगितले. या व्यापाऱ्याचे पोलिसांना नाव सांगितल्यानंतर पोलिसांच्या भीतीने सदर गुटखा माफिया फरार झाला आहे. रायगड पोलिसांचे विशेष पथक त्याचा कसून शोध घेत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये पूर्णपणे गुटखाबंदी असल्याने गुटख्याचे उत्पादन देखील पूर्णपणे बंद आहे.

सदरचा गुटखा माफिया कर्नाटक राज्यातून खूप मोठ्या प्रमाणावरती गुटखा आणुन म्हसळा येथील आपल्या गोदामामध्ये ठेवत असे. त्या ठिकाणाहून सदरचा गुटखा श्रीवर्धन, म्हसळा, तळा, रोहा, माणगाव,मुरुड, महाड, पोलादपूर इत्यादी सर्व ठिकाणी पुरविला जात असे. आजपर्यंत अनेक वेळा पोलिसांनी गुटखा पकडण्यासाठी स्थानिक व्यापाऱ्यांकडे छापेमारी केली. परंतु स्थानिक व्यापाऱ्यांकडून गुटखा माफिया कोण आहे? याबाबत माहिती पोलिसांना मिळाली नव्हती,

परंतु रायगडच्या पोलीस अधीक्षक यांनी अशा प्रकारे काळे धंदे करणाऱ्यांवरती कडक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे चरस, गांजा, गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. श्रीवर्धन शहरात देखील परराज्यातून आलेले काही व्यापारी टोबॅको स्टोअर्सच्या नावाखाली गुटख्याची सर्रासपणे विक्री करत होते, परंतु सध्या गुटखा विक्री करणारा माफीया गायब झाल्यामुळे गुटखा विक्रीचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे. अंमली पदार्थ व गुटख्यासारख्या घातक तंबाखूजन्य पदार्थावरती रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी धडक कारवाई केल्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# गुरे चोरांविरोधात नागोठणे पोलिसांची धडक कारवाई



## १२ म्हशी, ६ रेडे यांच्यासह १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नागोठणे : प्रतिनिधी**

रात्रीचा अंधाराचा फायदा घेऊन गुरे चोरणाऱ्या टोळ्यांनी जिल्ह्यात हैदोस घातलेला असून ही चिंतेची बाब आहे. गुरे चोरांबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर नागोठणे पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी जागृतता दाखवीत शनिवार दि. १२ रोजी एका आयशर टेम्पो ( एम. एच. ०३ डी व्ही ८०२१) व चोरीच्या १२ म्हशी व ६ रेडे अशी १८ जनावरे जप्त केले.

असून याबाबत नागोठणे पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आयशर टेम्पोसह जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १५ लाख रुपये असून टेम्पो चालक मोसिन आसमहंमद कुरेशी वय २५ रा. लोटस मोहल्ला शिवाजीनगर गोवंडी मुंबई याला नागोठणे पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला असून पुढील तपास नागोठणे पोलिस स्टेशचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राजहंस नागदिवे हे करीत आहेत.

दरम्यान मुक्या जनावरांचा जीव वाचविण्यासाठी मोलाचे सहकार्य नागोठण्यातील गोरक्षक चेतन कामथे, सौरभ जांबेकर व मनिष पवार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर अपघात ट्रकचालकाचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुबई पुणे एक्सप्रेसवेवर अपघाताची मालिका सतत चालू असून आज पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास एका टाटा ट्रकने समोरील उभ्या असलेल्या डिझेलच्या टँकरला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून, या अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला

मुबंई पुणे एक्सप्रसवेवरून टाटा ट्रक चालक समर बहादूर यादव (रा बिल कोटीयन रामपूर, जोधपूर राज्य उत्तरप्रदेश) हा मुबंईहुन पुण्याकडे ट्रक घेऊन जातं असताना, तो खालापूर टोल नाक्याजवळ आला असता पुढे शोल्डर लेनला उभ्या असलेल्या डिझेल टँकरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला या अपघातात ट्रकची केबिन पूर्णपणे दबून त्यात अडकून चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे तर ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून डिझेल टँकर मधून डिझेल गळती झाली होती. तात्काळ महामार्गावरील सुरक्षा यंत्रणांनी धाव घेत बचाव कार्यात भाग घेतला. पुढील तपास सुरू आहे.



# खासदार धैर्यशील पाटील यांना पेन्शनर्सनी दिले निवेदन

**रोहे प्रतिनिधी**

राज्यसभा खा. धैर्यशिल पाटील यांना इपीएस ९५, राष्ट्रीय संघर्ष समिती रोहा पेन्शनरांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे हा प्रश्न सर्वोच्च सभागृहात मांडण्याची विनंती केली आहे.

दिलेल्या निवेदनात देशातील सुमारे १८७ विविध उद्योगधंदयातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर उतारवयात आर्थिक व सामाजिक सुरक्षा मिळावी या उदात्त हेतुने भारतीय राज्यघटनेनुसार केंद्र सरकारने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अंमलात आणला. १९९२-९३ ला या सर्व कायदयाचे एकत्रीकरण करून नवीन



कायदा करण्यासाठी सरकारने एक समिती गठीत केली. त्यातून इपीएस ९५ पेन्शन योजना (कर्मचारी सेवानिवृत्ती योजना १९९५) तयार करण्यात आला. १६ नोहेंबर १९९५ पासुन अंमलबजावणी केली. १९९५ पेन्शन योजना कशी फायदेशीर आहे हे सांगण्यासाठी भविष्य निर्वाह कार्यालयाने तथा EPFO ने देशभर वेगवेगळ्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन हि योजना सरकारी पेन्शन योजनेपेक्षा १० टक्के अधिक लाभदायक असून दर तीन वर्षाच्या कालावधीत त्याचे मुल्यांकन (पुर्नमुल्यांकन) करण्यात येईल, असे सुचित केले.

तथापी या पेन्शन योजनेमध्ये १९९६ पासून वेळोवेळी अनेक पेन्शनर विरोधी बाबी समाविष्ट करून ही योजना सुरु करताना जी आश्वासने दिली त्याला फाटा देऊन रु.४०० ते २५०० पर्यंत पेन्शन चालु केली. अत्यंत कमी पेन्शन वैद्यकीय सुविधाचा अभाव त्यामुळे प्रतिदीन २००, ३०० पेन्शन धारक स्वर्गीय होत आहेत त्याचा काहीही परिणाम शासनावर व राज्यकर्त्यांनवर होत नाही. हे पेन्शनधारकांचे दुदैव आहे इपीएस ९५ पेन्शन योजनेतील पेन्शन धारकांनी आपल्या देशाला समृध्द व बळकट करण्यासाठी आयुष्यभर योगदान दिलेले आहे.

आमच्या मिनीमम पेन्शन ७५०० रुपये + डी.ए व आरोग्यसेवा हया मागण्या पुर्ण कराव्यात अशी पेन्शनधारकांची कळकळीची मागणी आहे. निवेदन देणेसाठी, राष्ट्रीय संघर्ष समिती अध्यक्ष मालु पांडू पाबरेकर, सचिव देवराम कर्णेकर, शेलार व सदस्य उपस्थित्त होते.

# कोर्लई हायस्कूल येथे गुरू पौर्णिमा उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील सुप्रसिद्ध ख्रिचन समाजाची माऊंट कार्मेल हायस्कूल येथे गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी शाळेच्या भव्य प्रांगणावर सर्व मुले मुली एकत्र झाली होती. गुरूपौर्णिमा साजरी करण्यासाठी मुलानी अथक परिश्रम करून आपल्या आवडत्या शिक्षकांसाठी विशेष रंगी बेरंगी भेट कार्ड तयार केली होती. तसेच सर्व मुलांनी गुलाब पुष्प सुधा आणले होते. सर्व प्रथम कार्यक्रमाची सुरुवात होताच सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या सर्व शिक्षकांना भेट कार्ड व गुलाब पुष्प देऊन लोटांगण घालून नमस्कार करून गुरुजनांविषयी आदर भाव व्यक्त केला.



तद्नंतर या शाळेचे अध्यक्ष रेव्ह. फादर बोनावेंचर नुनीस यांनी शालेय मुलांना मार्गदर्शन करताना संगितले की, आई वडील हे आपले प्रथम गुरू आहेत. शालेय जीवनात गुरूचा मान राखणे खूप आवश्यक आहे. गुरुजनांचा सन्मान ठेवणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे आद्य कर्तव्य आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आई वडलांप्रमाणे गुरूचे आशीर्वादसुद्धा आवश्यक असतात. त्यामुळे शाळेतून घरी जाताना ज्या प्रमाणे गुरूंना आदर्श मानता त्याचप्रमाणे आई वडील यांचा उचित सन्मान राखला गेला पाहिजे.

या शाळेचे कला शिक्षक राजेंद्र घोसाळकर यांनी सांगितले की, निसर्ग हा आपला सर्वात मोठा गुरू आहे. निसर्गाकडून आपण नवीन नवीन गोष्टी शिकत असतो. निसर्गा प्रती आदर भाव बाळगणे.तसेच नव नवीन वृक्ष लागवड करून निसर्गाची शोभा वाढवावी असा संदेश त्यांनी दिला.या वेळी इयत्ता नववीची विद्यार्थिनी जिज्ञासा कमलनाखवा हिने सर्व गुरुवर्य यांच्याबद्दल मनोगत व्यक्त करून गुरुवर्यना गुरु पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आभार उत्कृष्ट विद्यार्थी स्वराज महालकर याने आभार मानले. या वेळी शालेय विद्यार्थ्यांनी पुराण क्षेमधील गुरू विषयी गोष्टी सांगून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सिस्टर ज्यूली चांदी, रोशन मार्टिस, सुरेश वेगस, राजेंद्र घोसाळकर, शोधन बळकवडे अक्षता म्हात्रे, शुभांगी पंची, वित्रीण वेगस, सिस्टर शोभा त्रिभुवन, सुनील वेगस, फ्लाविया मार्टिस, वैशाली मॅडम, शिक्षकेत्तर कर्मचारी अल्बर्ट मार्टिस, मुख्य लिपीक हेंरी वेगस, लुसीअन गोम्स आदी मान्यवर उपस्थित होते.

# पालीवाला महाविद्यालयात लोकसंख्या दिन

**पाली: प्रतिनिधी**

पाली येथील शेठ जे.एन. पालीवाला महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना लोकसंख्या वाढीचे परिणाम व त्याबद्दल महत्वपूर्ण माहिती देण्यात आली. यावेळी अर्थशास्त्र विभागातून अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव देखील करण्यात आला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. सुधाकर लहुपचांग यांनी लोकसंख्या वाढीचा कल, पेट्रोलियम पदार्थ, लोकसंख्येचा विस्फोट, पृथ्वीवरील वातावरण, लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक देश प्रयत्नशील, जननदरक्षमता, लोकसंख्या वाढ नियंत्रण, या विषयावरती मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व पटवून दिले.

प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल झेंडे यांनी केले, प्रास्ताविकेत त्यांनी अर्थशास्त्र विभागाच्या मागील एक वर्षातील वाटचालीचा आढावा घेतला. तसेच त्यांनी जगाची वाढणारी एकुण लोकसंख्या, अन्नधान्याची कमतरता, नैसर्गिक संसाधनांवर पडणारा अतिरिक्त भार, संसाधनांचा वापर व त्याचे योग्य नियोजन यावरती आपले विचार मांडले. तसेच जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित महाराष्ट्र प्रबोधन मंडळाचे समन्वयक सतीश शिर्के यांनी मानसिक स्वास्थ, लोकसंख्या संसाधन, विकासाची राजनीती, युवकांची जबाबदारी, आपत्ती अधिकार व कर्तव्य या विषयावरती विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी तृतीय वर्ष कला अर्थशास्त्र विभागातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या वामन निरगुडे, साक्षी दळवी, ओमकार उघडा यांना प्राचार्यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच मागील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थी देखील या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रा. शिवपुजे, डॉ. एस.ए पाटील, प्रा. इनामदार, लिंनताज उके, डॉ. जालिंदर कळकुटे, डॉ. सोहनी, प्रा. एन.एन पाटील, डॉ. अंजली पुराणिक , प्रा. खैरनार, प्रा. सरिता देशमुख, प्रा. विशाखा मानकामे, प्रा. ससाने, प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. संतोष भोईर, डॉ. आरोटे मॅडम, साजेकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# सदगुरू आनंददादा मोरे माऊलींच्याहस्ते मंत्री भरत गोगावले यांचा हृद्य सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मोरेमाऊली सांप्रदायाचे समाधीमंदिर चंद्रभागेच्या तिरावर पंढरपूरमध्ये उभारले असून येत्या १ नोव्हेंबरला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्याचा मानस सदगुरू दादामहाराज मोरेमाऊलींनी व्यक्त केल्यानुसार हे काम भव्य प्रमाणात साकारण्यात येईल. काम एकदाच होणार असले तरी पुढील अनेक पिढयांसाठी प्रेरणादायी आणि अध्यात्माचा आवड निर्माण करणारे असेल, अशी ग्वाही महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना, खारजमीन आणि फलोत्पादन खात्याचे मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

सदगुरू मोरे माऊली सेवा समिती कोकण विभागातर्फे गुरूपौर्णिमा महोत्सव २०२५ चे आयोजन कॅप्टन विक्रमराव मोरे





सभागृहामध्ये करण्यात आले असता सांप्रदायातर्फे सदगुरू आनंददादा मोरे माऊलींच्याहस्ते ना.भरत गोगावले यांचा हृद्य सत्कार करण्याात आला. याप्रसंगी ना.गोगावले बोलत होते. याप्रसंगी व्यासपिठावर सदगुरू मोरे माऊली संप्रदायाचे अध्यक्ष अनंत पार्टे, उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, सचिव लक्ष्मण मोरे, उद्योजक दशरथशेठ उतेकर, प्रताप कुमठेकर, सतीश शिंदे, विनायक भोसले, खेडचे राजेंद्र शेलार, कृष्णा नरे, लक्ष्मणमहाराज खेडेकर, दगडूबुवा कदम, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी सदगुरू आनंददादा मोरे माऊलींनी प्रवचनामध्ये, गुरूपौर्णिमा महोत्सवाला शिष्यगणांना आशीर्वाद देऊन भक्तगणांच्या उध्दारासाठी उर्वरित वर्ष तपश्चर्येत घालविले जाते. या उत्सवाला महर्षि व्यासमुनींपासूनची गुरूशिष्य परंपरा असून यासाठी गुरू पदास पोहोचल्यावर संसारापासून दूर राहून साधकाच्या कल्याणासाठी निसंग व्हावे लागते,असे प्रवचनातून प्रबोधन केले. यावेळी पंढरपूर येथे सहस्त्रपंगत आणि श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा संकल्प असल्याचे यावेळी मोरेमाऊलींनी सांगितले. सकाळी वै.ज्ञानेश्वर मोरेमाऊली यांच्या प्रतिमेचे पूजन गोळेगणीतील प्रकाश भाऊराव मोरे यांच्याहस्ते करण्यात आली. त्यानंतर श्रीगुरूपरंपरेच्या अभंगावर सांप्रदायिक भजन करण्यात आले. आनंददादा मोरेमाऊली पाद्यपूजा व व्यासपीठ पूजन धामणदिवीतील श्रीराम विठोबा गायकवाड दांपत्याच्या हस्ते करण्यात आले.

निगडे येथील कृष्णा मोरे खोत, बळीराम दरेकर, अनिल पवार, दिलीप साळुंखे, अनिल भिलारे, खेडच्या सुप्रिया पवार, वंदना गोळे, सुमती कुमठेकर, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, शहरप्रमुख सुरेश पवार, ढवळेतील रमेश मोरे, दत्ता मोरे तसेच असंख्य महिला पुरूष साधकांनी यावेळी गुरूप्रति श्रध्दा व्यक्त केली आणि हजारो अनुयायांनी गुरूचरणस्पर्श करून आशीर्वाद घेतले.

# एनसीसी विद्यार्थ्यांचे स्वच्छता अभियान व वृक्षारोपण उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

के. एम. सी. कॉलेज, खोपोली येथील एन.सी.सी. कॅडेट्सनी स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. हा उपक्रम ए.एन.ओ. कॅ. शीतल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छता अभियानाने झाली, ज्यामध्ये कॅडेट्सनी कॉलेज कॅम्पस व परिसर स्वच्छ केला, प्लास्टिक कचरा गोळा केला आणि स्थानिक लोकांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत जनजागृती केली.स्वच्छता अभियानानंतर, ४० कॅडेट्सनी वृक्षारोपणात भाग घेतला आणि कॅम्पस व परिसरात ४० झाडांची लागवड केली. कॅडेट्सनी झाडांची काळजी घेण्याची आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याची शपथ घेतली.

या उपक्रमाचा उद्देश युवकांमध्ये स्वच्छता, जबाबदारी आणि पर्यावरण रक्षणाच्या मूल्यांची जाणीव निर्माण करणे हा होता. हा उपक्रम यशस्वी झाला असून सर्वांनी त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भारताची 'सुपरवुमन'! डाईव्ह मारत राधाचा अविश्वसनीय झेल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघ आणि इंग्लंड महिला संघात टी-२० मालिकेचा थरार रंगला. या मालिकेतील पाचवा टी-२० सामना शनिवारी झाला. या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला, पण हा सामना जिंकण्यासाठी भारतीय खेळाडूंना पूर्ण जोर लावला. सामना हातून निसटला, पण राधा यादवने क्षेत्ररक्षण करताना या मालिकेतील सर्वोत्तम झेल टिपला.



शेवटी इंग्लंडला सामना जिंकण्यासाठी ३ चेंडूत ५ धावा करायच्या होत्या. त्यावेळी एमी जोन्सने मारलेला चेंडू हवेत गेला. झेल घेणं कठीण होते, पण राधा यादवने धावत डाईव्ह मारली आणि भन्नाट झेल घेतला. या झेलमुळे सामना पुन्हा एकदा बरोबरीत आला होता. भारतीय संघाला सामना जिंकण्याची संधी होती, पण शेवटी इंग्लंडने बाजी मारली आणि हा सामना आपल्या नावावर केला. सामना जरी गमावला असला, तरीदेखील भारतीय संघाने ही मालिका ३-२ ने आपल्या नावावर केली. यासह इंग्लंडमध्ये पहिल्यांदाच टी-२० मालिका जिंकण्याचा मान पटकावला.

भारतीय संघाकडून निर्णायक षटक टाकण्यासाठी अरुंधती रेड्डी गोलंदाजीला आली. अरुंधतीने ऑफ स्टंपच्या बाहेर चेंडू टाकला. या चेंडूवर फलंदाजी करत असलेल्या एमी जोन्सने स्लॉग स्वीप मारला. चेंडू हवेत गेला त्यावेळी राधा यादव डीप मिडविकेटला क्षेत्ररक्षण करत होती. राधा धावत आली आणि तिने डाईव्ह मारत भन्नाट झेल घेतला. हा झेल टिपल्यानंतर तिसऱ्या पंचांना अनेकदा खात्री करून पाहिले. शेवटी त्यांनी बाद घोषित केले. हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

या सामन्यात भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला होता. भारतीय संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना २० षटकांअखेर ७ गडी बाद १६७ धावा केल्या. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करताना शेफाली वर्माने ४१ चेंडूंचा सामना करत १४ चौकारांच्या साहाय्याने ७५ धावांची दमदार खेळी केली. इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी १६८ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना डेनियल वॅट-हॉजने सर्वाधिक ५६ धावांची खेळी केली. तर सोफिया डंकलेने ४६ आणि शेवटी टॅमी ब्यूमॉँटने ३० धावांची खेळी करत इंग्लंडला ५ गडी राखून विजय मिळवून दिला.

## नीरज-अर्शद यांच्यात लढत

**नवी दिल्ली :** पोलंडमधील सिलेसिया येथे १६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या डायमंड लीग मध्ये दुहेरी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा गतविजेता अर्शद नदीम यांच्यात बहुप्रतिक्षित सामना होईल. पॅरिस ऑलिंपिक २०२४नंतर या दोन्ही खेळाडूंमध्ये ही पहिलीच लढत असेल. प्रतिष्ठित डायमंड लीग स्पर्धेच्या आयोजकांनी सांगितले की, पोलंडमधील चाहते नीरज चोप्रा आणि अर्शद नदीम यांच्यातील सामन्याची वाट पाहत आहेत. पॅरिस ऑलिंपिकनंतर भारताच्या नीरज चोप्रा आणि त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा अर्शद नदीम यांच्यातील सामना क्रीडा प्रेमींसाठी एक पर्वणी आहे.

# चिरनेरचा विराज नारंगीकर ठरला खासदार श्री २०२५चा मानकरी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील इतिहास प्रसिद्ध ऐतिहासिक चिरनेर गावचा सुपुत्र असलेल्या विराज संदीप नारंगीकर यांनी शरीर सौष्ठव स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करून, तो खासदार श्री २०२५ चा. प्रथम पारितोषिकाचा विजेता ठरला आहे. टंक नंबर ३०चा. मेन फिजिक चॅम्पियन अँड चॅम्पियनचा विजेता होऊन, तो प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला असून, विराजला खासदार श्री २०२५ हा मानाचा सन्मान देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने रोहा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शनिवारी जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही शरीर सौष्ठव स्पर्धा ही रोहा येथे झाली. यात संपूर्ण जिल्ह्यातील विविध तालुके, शहर आणि विभागातून



मोठ्या प्रमाणावर स्पर्धक सहभागी झाले होते. चिरनेर सारख्या ग्रामीण भागातून विराज नारंगीकरने आपला सहभाग नोंदवून या स्पर्धेत विजयाची मोहर उमटविल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शरीर सौष्ठव या क्षेत्राबद्दल विराजला लहानपणा पासून विशेष अशी आवड असून, त्याला त्याच क्षेत्रात आपले करिअर करण्याचा त्याचा मानस असल्याचे त्यांनी याबाबत माहिती देताना सांगितले.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत शनिवारी तालुका क्रीडा संकुल समितीची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीमध्ये तालुक्यातील सगळ्या खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी विविध स्पर्धा आगामी काळात राबवण्याबाबत तसेच खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला कुस्ती अध्यक्ष पनवेल बाळाराम पाटील, कनिष्ठ अभियंता निखिल गाडे, गटशिक्षणाधिकारी एस मोहिते, प्रशिक्षक रायगड व महाराष्ट्र अद्वैत शेंबवणेकर, पोलीस निरीक्षक अभिजित अभंग आदी उपस्थित होते.**

# टेनिसपटू इगा स्वियातेक विम्बल्डनची नवी सम्राज्ञी!

**लंडन : वृत्तसंस्था**

ऑल इंग्लंड क्लबच्या ग्रास कोर्टवर रंगलेल्या विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात इगा स्वियातेक हिने अमांडा अनिसिमोव्हा हिला ६-०, ६-० अशा फरकाने पराभूत करत विम्बल्डनचे पहिलेवहिले जेतेपद पटकावले आहे. या जेतेपदासह इगा स्वियातेक ही सेरेना विलियम्स हिच्यानंतर सर्वात कमी वयात चारही ग्रँडस्लॅम जिंकणारी महिला टेनिसपटू आणि विम्बल्डन स्पर्धा जिंकणारी ती पोलंडची पहिली महिला टेनिसपटू ठरलीये.



ग्रँडस्लॅमच्या आतापर्यंतच्या इतिहासात दुसऱ्यांदा महिला एकेरीतील फायनलची लढत सर्वात कमी वेळेसह ६-०, ६-० अशा स्कोअर लाइनसह संपली. याआधी १९८८मध्ये फ्रेंच ओपन स्पर्धेत स्टेफी ग्राफ हिने नताशा झ्वेरेव्हा हिला अशा फरकाने पराभूत केले होते. लाजिरवाण्या पराभवानंतर कोर्टवर मॅच खेळतानाच अमांडा अनिसिमोव्हाला अश्रू अनावर झाल्याचे पहायला मिळाले.

# ऋषभ पंतचा पराक्रम : विकेट किपर बॅटरच्या रूपात इंग्लंडमध्ये सर्वाधिक धावा

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड-भारत यांच्यातील अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी स्पर्धेतील तिसरा कसोटी सामना लंडन येथील लॉर्ड्सच्या मैदानात खेळवण्यात येत आहे. बुमराहचा चेंडू लागल्यामुळे बोटाला झालेल्या दुखापतीमुळे मैदान सोडणाऱ्या ऋषभ पंतने बॅटिंगवेळी इंग्लंडच्या गोलंदाजांना वेदना दिल्या. पंतने ११२ चेंडूचा सामना करताना आठ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७४ धावांची खेळी केली.

क्रिकेटच्या पंढरीत शतकी डाव साधण्याची पंतकडे मोठी संधी होती, पण त्याने स्वत: चोरटी धाव घेण्याच्या नादात आपली विकेट गमावली. एका चुकीमुळे पंतने शतकी खेळीची संधी गमावली असली तरी अर्धशतकी खेळीसह त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली आहे. यात महेंद्रसिंह धोनीच्या विक्रमाशी बरोबरी करण्यासोबतच इंग्लंडच्या मैदानात विकेट किपर बॅटरच्या रूपात इंग्लंडमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम त्याने आपल्या नावे केला आहे.

इंग्लंडविरुद्धच्या लीड्स येथील हेडिंग्लेच्या मैदानातील कसोटी सामन्यात पंतच्या भात्यातून दोन शतके पहायला मिळाली होती. पहिल्या डावात त्याने १३४ धावा, तर दुसऱ्या डावात ११८ धावांची खेळी केली. बर्मिंगहॅमच्या मैदानातील



एजबॅस्टनच्या मैदानातील सामन्यात पहिल्या डावात २५ धावा केल्यावर दुसऱ्या डावात त्याने ६५ धावांचे योगदान दिले होते.

तिसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावातील ७४ धावांसह त्याने पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या पाच डावात आपल्या खात्यात ४१६ धावा जमा केल्या आहेत.

### रोहित शर्माच्या विक्रमाशी बरोबरी

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात ७४ धावांच्या खेळीत ऋषभ पंतच्या भात्यातून दोन षटकार आल्याचे पहायला मिळाले. या दोन षटकारांच्या मदतीने कसोटीत भारताकडून सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पंतने रोहित शर्माची बरोबरी केली आहे. पंतने ४६व्या सामन्यात रोहितएवढे षटकार मारले आहेत. या यादीत वीरेंद्र सेहवाग ९० षटकारांसह सर्वात अव्वलस्थानी आहे.

# मला भारतासाठी खेळायचंय -रहाणे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीतील तिसरा कसोटी सामना लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. दोन्ही संघांनी दोनपैकी १-१ सामने जिंकले आहेत. तिसऱ्या कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवसाच्या खेळादरम्यान हा सामना सुरू असताना भारताचा स्टार फलंदाज अजिंक्य रहाणेने भारतीय संघासाठी कसोटी क्रिकेट खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

अजिंक्य रहाणे सध्या इंग्लंडमध्ये आहे. त्याने विम्बल्डन स्पर्धा पाहण्यासाठी हजेरी लावली होती. तिसऱ्या दिवसातील पहिल्या सत्राचा खेळ संपल्यानंतर अजिंक्य रहाणे हा नासीर हुसेन आणि मायकल आथर्टनसोबत गप्पा मारताना दिसून आला. रहणेला



इंग्लंडमध्ये खेळण्याचा चांगलाच अनुभव आहे. या चर्चेदरम्यान आथर्टन यांनी रहाणेच्या कसोटी कारकिर्दीचा उल्लेख केला.


या चर्चेदरम्यान आथर्टन यांनी अजिंक्य रहाणेला कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याबाबत प्रश्न विचारला. ते म्हणाले, रहाणे तू ३७ वर्षांचा झाला आहेस. तू कसोटी कसोटी क्रिकेट खेळण्याचा विचार सोडून दिला आहेस का? या प्रश्नाचे उत्तर देताना रहाणे म्हणाला, मुळीच नाही, मला इथे येऊन खूप आनंद झाला आहे. मला अजूनही कसोटी क्रिकेट खेळायचे आहे. सध्या मी माझा खेळ एन्जॉय करतोय. फिट राहण्यासाठी मी माझा ट्रेनर आणि ट्रेनिंगचे कपडेसोबत घेऊन आलो आहे. देशांतर्गत स्पर्धांना लवकरच सुरुवात होणार आहे. त्यामुळे मला तयारी करायची आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारतीय संघाला ऐतिहासिक विजय मिळवून देणारा अजिंक्य रहाणे गेल्या काही महिन्यांपासून संघाबाहेर आहे. २०२३मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळताना दिसून आला होता. त्यानंतर तो संघाबाहेर झाला. तेव्हापासून ते आतापर्यंत तो भारतीय संघात पुनरागमन करू शकलेला नाही. सध्या तो देशांतर्गत क्रिकेट खेळतोय. मुंबईकडून खेळताना त्याने दमदार कामगिरी केली आहे.

# महेश दाभाडे आशियाई कराटे प्रशिक्षक परीक्षा उत्तीर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीलंका येथे नुकत्याच झालेल्या साऊथ एशियन कराटे स्पर्धा व प्रशिक्षक परीक्षा स्पर्धेत नवी मुंबईतील महेश दाभाडे यांनी यश मिळविले. ही कराटेमधील एक महत्त्वाची परीक्षा आहे.



साऊथ एशियन कराटे फेडरेशनने घेतलेल्या या परीक्षेत साऊथ एशियामधील सर्व देशांनी सहभाग घेतला होता. परीक्षा श्रीलंकेतील कोलंबो येथे साऊथ एशियन कराटे फेडरेशनचे अध्यक्ष भरत शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. महेश दाभाडे हे ही परीक्षा उत्तीर्ण होणारे नवी मुंबईमधून दुसरे कराटे प्रशिक्षक आहेत.

या परीक्षेसाठी युनिव्हर्स कराटे अकॅडमीचे अध्यक्ष शिहान शिवाजी ढवळे यांचे मार्गदर्शन दाभाडे यांना लाभले. कराटे असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहान सल्लाउदिन अन्सारी, सेक्रेटरी संदीप गाडे यांनी दाभाडेंचे अभिनंदन केले.

# पनवेलमध्ये जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील नुकत्याच हाय-फिटनेस स्टुडिओ येथे 'जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५' स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या.

अमेचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आणि महाराष्ट्र इंडियन पॉवरलिफ्टिंग फेडरेशनच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्ट्स फाउंडेशन, नवी मुंबई यांच्या वतीने 'जिल्हा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५' स्पर्धेचे आयोजन नुकताच करण्यात आले होते. हि स्पर्धा महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग संघटनेचे सेक्रेटरी छत्रपती अवॉर्ड विजेते संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून स्पर्धेत अनेक नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिम ओनर प्रशांत खुटले यांना उद्योजक मिलिंद पोटे, पॅन ३ शोरूम मालक राजूभाई धरोड, राजेश सर व मास्टर रेहांश यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना उद्योजक मिलींद पोटे यांनी सांगितले की, पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात ही स्पर्धा भरविण्यात येईल. यामध्ये मास्टर रेहांश याचा मोठा सहभाग असेल. अशा प्रकारच्या स्पर्धा सातत्याने पनवेलमध्ये भरविणे गरजेचे आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com